रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १६ ◆ अंक ११९
www.ramprahar.com

गुरुवार, १६ नोव्हेंबर २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

अंतरंग

दीपावलीनिमित्त पनवेल, उरणमध्ये व्यापाऱ्यांचे स्नेहसंमेलन/३

सलग सुट्ट्यांमुळे रायगडात पर्यटकांची मोठी गर्दी/५

महाडच्या रोशनी पारधीची महाराष्ट्र क्रिकेट संघात निवड/८

## भारताची वर्ल्डकपच्या अंतिम सामन्यात धडक

**मुंबई :** वर्ल्डकप स्पर्धेतील गटफेरीचे सामने संपले असून पहिला उपांत्य सामना बुधवारी (दि. १५) यजमान भारतविरूद्ध न्यूझीलंडमध्ये खेळला गेला. या सामन्यात भारताने न्यूझीलंडचा ७० धावांनी पराभव करीत वर्ल्डकपच्या अंतिम फेरीत धडक दिली आहे. भारताने प्रथम फलंदाजी स्वीकारून ३९७ धावांचा डोंगर उभारला होता, मात्र किवींचा संघ ३२८ धावांवर सर्वबाद झाला. २०१९मध्ये किवी संघाने कोट्यवधी भारतीयांचे स्वप्न भंग करून अंतिम फेरीत धडक मारली होती. त्या पराभवाचा बदला घेण्यासाठी टीम इंडिया उतरली आणि यशस्वी झाली. आता दुसरा सेमीफायनल सामना गुरुवारी (दि.१६) दक्षिण आफ्रिका आणि ऑस्ट्रेलियामध्ये खेळला जाणार असून त्यांच्यातील विजेता संघ अंतिम सामन्यात भारताविरूद्ध खेळणार आहे.



# जम्मूमध्ये बस दरीत कोसळून ३६ प्रवासी ठार

**जम्मू : वृत्तसंस्था**

जम्मूहून किश्तवाडला जाणारी बस दरीत कोसळून ३६ लोक मृत्यूमुखी पडले, तर अनेक प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. दरीत कोसळलेल्या बसमधील प्रवाशांना वाचवण्यासाठी प्रशासनाने बचाव मोहीम हाती घेतली.

या बसमधून ५५ जण प्रवास करीत होते. जम्मूवरून किश्तवाडला जात असताना बस डोडाजवळ खूप उंचावर आणि वळणावळणाचे रस्ते आहेत. त्याच दरम्यान बस दरीत कोसळली.



काही जखमी प्रवाशांना डोडा शासकीय रुग्णालयात तर काहींना किश्तवाड जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. जखमींपैकी अनेकांची प्रकृती चिंताजनक आहे. त्यामुळे मृतांची

**१९ जण जखमी**

संख्या वाढण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अपघातातील मृतांना श्रद्धांजली वाहिली आहे. पंतप्रधान कार्यालयाने एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर एक पोस्ट केली आहे. यात त्यांनी म्हटले आहे की, जम्मू-काश्मीरच्या डोडा येथे झालेला अपघात दुर्दैवी आहे. ज्यांनी आपल्या कुटुंबातील सदस्य गमावले त्यांच्याबद्दल माझ्या संवेदना. जखमी झालेले प्रवासी लवकरात लवकर बरे व्हावेत, अशी मी प्रार्थना करतो, तसेच या अपघातातील मृताच्या कुटुंबीयांना पीएमएनआरएफकडून प्रत्येकी दोन लाख रुपये आणि जखमींना ५० हजार रुपये दिले जातील.



(छाया : योगेश पाटील)

# पैशांवाचून मुलींचे शिक्षण थांबू देणार नाही -आमदार प्रशांत ठाकूर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मुलींना भविष्यात शिक्षण घेण्यासाठी कोणत्याही प्रकारची मदत लागेल ती मदत माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली काम करीत असलेल्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या माध्यमातून करण्यात येईल. पैशांवाचून कोणत्याही मुलीचे शिक्षण थांबू देणार नाही, अशी ग्वाही भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांनी वाजे येथे सायकल वाटपावेळी दिली.

दिवाळीनिमित्त भाजपच्या माध्यमातून वाजे हायस्कूलमधील ३२ मुलींना सायकलीचे वाटप आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते मंगळवारी (दि. १४) करण्यात आले, तसेच हा कार्यक्रम नेरे आणि रिटघरमध्ये राबवण्यात येणार असेही त्यांनी सांगितले.

वाजे हायस्कूलमध्ये परिसरातील अनेक मुली शिक्षणासाठी येतात. त्यांना हायस्कूलमध्ये येणे आणखी सुलभ व्हावे यासाठी भाजपच्या माध्यमातून आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वतीने मुलींसाठी सायकली देण्यात आल्या आहेत. गाढेश्वर गावातील १०, देहरंग येथील आठ,

## वाजे येथे भाजपतर्फे सायकल वाटप

वाजापूर येथील सहा, मनिकमाळ येथील तीन, धोदाणीमधील दोन, सांगटोली येथील दोन आणि वापदेववाडीतील एक अशा ३२ विद्यार्थिनींना सायकलींचे वाटप करण्यात आले. या वेळी भाजपचे तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, विभागीय अध्यक्ष सुनील पाटील, मालडूंगेचे सरपंच सितााराम पाटील, अध्यक्ष राजेश भोईर, वाजेचे माजी उपसरपंच श्री. पाटील, भगवानशेठ पाटील, सदस्य पद्माकर वाघ, गणेश शिद, नारायण भगत, राम पाटील, माजी सरपंच बेबी भगत, ताई चंदर भस्मा, धर्मा आंबो, विष्णु पारधी, वनिता वाघ, ज्येष्ठ कार्यकर्ते राघो वाघ, वाजे ग्रामपंचायतीचे उपसरपंच गणेश पाटील, माजी सरपंच राजेंद्र भालेकर, माजी सदस्य श्री. भोईर, प्रतिभा कातकरी, गौरी कातकरी यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी नुकत्याच झालेल्या ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये विजयी झालेल्या सदस्यांचा सत्कारही केला.

# सर्वांच्या स्वप्नातील महाराष्ट्र घडवणार -मुख्यमंत्री शिंदे

## नंदुरबार येथे आदिवासी सांस्कृतिक महोत्सवाचे उद्घाटन

**नंदुरबार : प्रतिनिधी**

आदिवासी बांधवांच्या सर्वांगिण विकासाबरोबरच त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी व सर्व जाती-जमातींच्या विचारांचा आणि स्वप्नातला महाराष्ट्र घडविण्यासाठी शासन वचनबद्ध आहे. आदिवासी बांधवांचा गौरव वाढवतानाच त्यांच्या विकासासाठी जनजातीय गौरव दिवस व सांस्कृतिक महोत्सवसारख्या अभियानाच्या रुपाने आणखी एक पाऊल पुढे टाकले जात आहे. त्यासाठी सर्वांचा विकास हे उद्दीष्ट ठेवून सुरू असलेले



केंद्र सरकारचे काम आम्हाला निरंतर प्रेरणा देत आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

नंदुरबार येथे बुधवारी (दि. १५) राज्यस्तरीय जनजातीय गौरव दिवस व आदिवासी सांस्कृतिक महोत्सवाच्या उद्घाटनावेळी ते बोलत होते. या वेळी राज्यपाल रमेश बैस, आदिवासी विकासमंत्री डॉ. विजयकुमार गावित, मदत व पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अनिल पाटील, जिल्हा परिषद अध्यक्ष डॉ. सुप्रिया गावित, खासदार डॉ. हिना गावित, राज्यपाल यांच्या सचिव श्वेता सिंघल, आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे, विभागीय आयुक्त राधाकृष्ण गमे, जिल्हाधिकारी मनीषा खत्री विविध यंत्रणांचे अधिकारी, पदाधिकारी, अधिकारी व आदिवासी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे पुढे म्हणाले की, आदिवासी बांधवांचा सर्वांगिण विकास साधण्यासाठी शिक्षण, रोजगार, आरोग्य यासोबतच आदिवासी जिल्ह्यातील पायाभूत सुविधा बळकट करणे अशा सर्व बाजूने शासन स्तरावर प्रयत्न सुरू आहेत. **(पान २ वर..)**

## देशातील पहिले व्हेल रेस्क्यु ऑपरेशन यशस्वी

**रत्नागिरी : प्रतिनिधी**

जिल्ह्यातील गणपतीपुळे येथे व्हेल माशाचे रेस्क्यू ऑपरेशन केले गेले. व्हेलला जिवंत पाण्यात सोडण्याचे हे देशातील पहिले रेस्क्यु ऑपरेशन ठरले आहे. तब्बल ४० तास या ठिकाणी व्हेलला वाचवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले गेले. त्यानंतर रात्री उशिरा व्हेल माशाचे पिल्लू समुद्रात सुखरूप गेले.

कोस्टगार्डसह सर्वच विभागांनी यामध्ये पुढाकार घेत व्हेल माशाच्या पिल्लाला समुद्रामध्ये सुखरूप सोडले. रात्री ११ वाजण्याच्या सुमारास हे ऑपरेशन यशस्वीपणे पार पडले. समुद्रामध्ये जवळपास चार ते पाच किमी आत या पिल्लाला सोडल्यानंतर समुद्रकिनाऱ्यावर सर्वांनी जल्लोष केला.

## निवडक

### उद्योगपती सुब्रत रॉय यांचे दीर्घ आजाराने निधन

**मुंबई :** सहारा इंडिया समुहाचे प्रमुख सुब्रत रॉय यांचे मंगळवारी (दि. १४) निधन झाले. ते ७५ वर्षांचे होते. मागील काही महिन्यांपासून ते आजारी होते. त्यांच्यावर मुंबईतील खासगी रुग्णालयात उपचार सुरू होते. सुब्रत रॉय यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना आणि नातवंडे असा परिवार आहे. भारतीय कॉर्पोरेट जगतात त्यांनी आपली वेगळी छाप सोडली होती.

### ठाकरे गटाचे उपनेते अद्वय हिरे यांना बँक घोटाळाप्रकरणी अटक

**नाशिक :** मालेगाव येथील रेणुकादेवी सहकारी सूतगिरणी उभारणीसाठी नाशिक जिल्हा बँकेकडून घेतलेल्या कर्ज रकमेत घोटाळा केल्याप्रकरणी ठाकरे गटाचे उपनेते अद्वय हिरे यांना अटक झाली आहे. उच्च न्यायालयाने अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळल्यानंतर पोलीस त्यांच्या मागावर होते. बुधवारी (दि. १५) भोपाळ येथून नाशिक गुन्हे शाखेने त्यांना ताब्यात घेतले आहे.

## पुण्यात आढळला झिकाचा रुग्ण

**पुणे :** शहरात झिका आजाराचा यंदा पहिला रुग्ण येरवड्यातील प्रतीकनगरमध्ये सापडला आहे. आरोग्य विभागाने प्रतिबंधात्मक उपाययोजना सुरू केल्या आहेत.

झिकाचा संसर्ग झालेली ६४ वर्षांची महिला आहे. काही दिवसांपूर्वी एका सांस्कृतिक कार्यक्रमात या महिलेने हजेरी लावली होती. त्यानंतर तिला ताप आला आणि अंगदुखीचा त्रास होऊ लागला. तिच्या तपासणीत अखेर झिकाचे निदान झाले.



**पनवेल : जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या सीकेटी महाविद्यालयाची विद्यार्थिनी स्वस्तिका घोष हिने गोवा येथे झालेल्या ३७व्या नॅशनल गेम्समध्ये दोन सुवर्ण आणि एक कांस्यपदक पटकावून संस्थेसह पनवेलला नावलौकिक मिळवून दिला आहे. या चमकदार कामगिरीमुळे तिची चीन येथे होणाऱ्या आयटीटीएफ मिक्स वर्ल्डकपसाठी भारतीय संघात निवड झाली आहे. त्याबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी स्वस्तिका घोषचे अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.**

## राज्यात ८२३ नव्या प्रकल्पांना महारेरा नोंदणी क्रमांक मंजूर

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र स्थावर संपदा प्राधिकरणाने (महारेरा) दसरा व दिवाळीत विकासकांना नव्या गृहप्रकल्पांची जाहिरात करता यावी यासाठी राज्यात ८२३ प्रकल्पांना मंजुरी दिली आहे. अटी व शर्तींची वेळेत पूर्तता करणाऱ्या ६४५ प्रकल्पांना ऑक्टोबर, तर १३ नोव्हेंबरपर्यंत १७८ प्रकल्पांना मंजुरी दिली आहे. त्यामुळे या विकासकांना या प्रकल्पाची जाहिरात व विक्री करता येणार आहे.

यामध्ये मुंबई महानगरासह कोकण ३८२, पुणे २५७, नागपूर ७७, नाशिक ५७, छत्रपती संभाजीनगर ३३ आणि अमरावतीच्या १७ प्रकल्पांचा समावेश आहे. गेल्या ऑक्टोबर आणि नोव्हेंबर या कालावधीत ७६९ परवानग्या देण्यात आल्या होत्या. यावर्षी ऑक्टोबरमध्ये १२०८ आणि १३ नोव्हेंबरपर्यंत सुमारे ४१४ प्रकल्पांनी नोंदणी अर्ज केले होते, परंतु नोंदणीसाठीच्या कागदपत्रांची व्यवस्थित पूर्तता न केल्याने त्या सर्वांना नोंदणीक्रमांक अद्याप मिळू शकलेला नाही. त्यामुळे या प्रकल्पातील विकासकांना जाहिरात व विक्री करता येणार नाही.



## भायखळा येथील इमारतीला आग

### नागरिकांना वाचविण्यात यश

**मुंबई : प्रतिनिधी**

भायखळा पश्चिम शकील स्ट्रीट ३ येथील तळ अधिक तीन मजली सेफ इमारतीच्या तळ मजल्यावर बुधवारी (दि. १५) सकाळी ७.३० वा.च्या सुमारास भीषण आग लागली. काही मिनिटातच आग वाऱ्यासारखी पसरली आणि शेजारील जुबली आणि धोबीघाट या दोन इमारतींना आगीची झळ बसली.

या घटनेत दोन सिलिंडरचा स्फोट झाल्याने परिसर हादरला. दुसऱ्या व तिसऱ्या मजल्यावर अडकलेल्या दोन लहान मुलांसह महिला व पुरुषांना सुखरुप बाहेर काढल्याचे मुंबई अग्निशमन दलाने सांगितले.

या वेळी दोन लहान मुलांसह महिला व पुरुष असे नऊ जण अडकल्याचे समजले. अग्निशमन दलाच्या जवानांनी धाव घेत अडकलेल्या नऊ जणांना सुखरुप रेस्क्यू केल्याचे सांगळे यांनी सांगितले. आगीचे नेमके कारण कळू शकले नसले तरी या घटनेची स्थानिक पोलीस, पालिका अधिकारी व अग्निशमन दलाचे अधिकारी तपास करीत आहेत.

# दिवाळी सुट्टीत पर्यटकांची मुरूडला पसंती

**मुरूड : रामप्रहर वृत्त**

तालुक्यातील काशीद, मुरूड, नांदगाव व ऐतिहासिक जंजिरा किल्ल्यावर दिवाळीच्या सुटीनिमित्त पर्यटकांनी मोठी गर्दी केली. राजपुरी येथे जंजिरा किल्ल्याचे तिकीट काढण्यासाठी पर्यटकांची गर्दी झाली.

सकाळी ७ वाजल्यापासून पर्यटक राजपुरी जेटीवर व खोरा जेटीवर हजार झाले, परंतु जंजिरा किल्ला विभाग सकाळी ९.३० शिवाय उघडत नाही. बोटीतून किल्ल्यात जाणार तोपर्यंत उन्हाचा पारा चढतो. त्यामुळे किल्ला सकाळी ८ वाजता उघडण्याची विनंती पर्यटक



(छाया : सुधीर नाझरे)

## जंजिरा किल्ला पाहण्यासाठी लागल्या रांगा

करीत आहे.

पर्यटकांनी शनिवारी सायंकाळपासून गर्दी करण्यास सुरुवात केली. सर्व लॉज फुल झाले आहेत. समुद्रकिनारी असणाऱ्या प्रत्येक स्टॉलवर गर्दी पहावयास मिळत आहे. जंजिरा किल्ल्यावरसुद्धा मोठी गर्दी पहावयास मिळाली. रस्त्याच्या दोन्ही बाजूस वाहनांची मोठी गर्दी दिसत असून काही काळ वाहतूक कोंडीसुद्धा झाली, परंतु वाहतूक पोलिसांनी आपली भूमिका चोख बजावत असल्याने वाहतुकीस रस्ता मिळत होता.

### चविष्ट मासे आणि विविध राईड्सचाही घेतला आनंद

*हॉटेलमधील चविष्ट मासे खाण्यासाठी पर्यटकांनी मोठी गर्दी केल्याचेसुद्धा दिसून आले. पर्यटकांची संख्या वाढल्याने हॉटेल, लॉजिंग, लहान खाण्याची दुकाने सर्वांनाच चांगला व्यवसाय मिळाला. पर्यटकांमुळे मुख्य बाजारपेठेतसुद्धा गर्दी दिसून आली. विविध वस्तू खरेदीसाठी पर्यटक बाजारपेठेतसुद्धा आले होते. समुद्रस्नान, बोटिंग, उंट सफारी, बनाना राईड आदींचा आनंद लुटताना पर्यटक दिसत होते.*



# विराटची ५०व्या वनडे शतकाला गवसणी

**मुंबई : प्रतिनिधी**

सचिन तेंडुलकरच्या अविश्वसनीय ४९ वनडे शतकांचा विक्रम मोडत विराट कोहलीने वर्ल्डकप स्पर्धेतील न्यूझीलंडविरुद्धच्या सेमी फायनल लढतीत ५०व्या शतकाला गवसणी घातली. लॉकी फर्ग्युसनच्या चेंडूवर धाव घेत विराटने हा विक्रम नावावर केला. काही दिवसांपूर्वीच दक्षिण आफ्रिकेविरुद्ध विराटने सचिनच्या विक्रमाची बरोबरी केली होती. बुधवारी मुंबईत विराटने संयमी खेळ करीत शतकाची नोंद केली.

विराटचे आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधले ८०वे शतक आहे. १४ वर्षांनंतर विराटने वनडे शतकांचे अर्धशतक पूर्ण केले आहे. विराटचे वनडेतले न्यूझीलंडविरुद्धचे हे सहावे शतक आहे, तर मायदेशातले २२वे शतक आहे. शतकानंतर मैदानात मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरला अभिवादन करीत विराटने शतक साजरे केले.



### श्रेयस अय्यरचीही शानदार सेंच्युरी

श्रेयस अय्यरने ६७ चेंडूंमध्ये चार चौकार आणि सात षटकारांची आतषबाजी करीत आपले शतक पूर्ण केले. त्यानंतर बॅट उंचावून उपस्थितांना अभिवादन केले. १०५ धावांची महत्त्वाची खेळी करीत श्रेयस अय्यर बाद झाला, मात्र त्याची ही खेळी कायमच लक्षात राहिल यात काहीच शंका नाही. श्रेयस अय्यरने ७० चेंडूंमध्ये चार चौकार आणि आठ षटकार खेळत १०५ धावा केल्या. अवघ्या ६७ चेंडूत आपले शतक पूर्ण केले. या सामन्यात त्याने ७० चेंडूत आठ षटकार आणि चार चौकारांच्या मदतीने उत्कृष्ट खेळी करीत वीरेंद्र सेहवागचा विक्रम मोडीत काढला.

# हिंदायान राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतिक बनेल -मुख्यमंत्री

## सायकल स्पर्धा आणि मोहिमेची नोंदणी सुरू

**ठाणे : प्रतिनिधी**

हिंदायान हे निश्चितच आपल्या भारतीय वारसाचे, संस्कृतीचे आणि राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतिक बनेल, असे गौरवोद्गार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी येथे काढले.

शासकीय निवासस्थान वर्षा येथे सोमवारी (दि. १३) हिंदायान सायकल स्पर्धा आणि मोहीम २०२४च्या दुसऱ्या पर्वाच्या नोंदणी शुभारंभप्रसंगी ते बोलत होते.

या वेळी हिंदायानमध्ये सामील होण्यासाठी नागरिकांना प्रोत्साहित करताना मुख्यमंत्री म्हणाले, सायकल चालविणे आपल्या आरोग्यासाठी तसेच पर्यावरणासाठीही निश्चित उपयुक्त आहे. सध्याच्या परिस्थितीत पर्यावरण रक्षणासाठी शक्य तिथे सायकलचा वापर करणे, ही काळाची गरज बनली आहे. हिंदायानच्या दुसऱ्या पर्वात विविध मोहिमा आणि स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे. या पर्वात ही



स्पर्धा व मोहीम सर्वांसाठी खुली आहे. ही मोहीम १० फेब्रुवारी २०२४ रोजी नवी दिल्ली येथून सुरू होईल आणि आग्रा, जयपूर, गांधीनगर, ठाणे आणि मुंबईमार्गे पुण्यात पोहोचल्यानंतर याची सांगता होईल.

याशिवाय, महाराष्ट्रातील सिंधुदूर्ग जिल्ह्यात १ ते ३ मार्च २०२४ या कालावधीत प्रत्येकी ११० किमीच्या तीन टप्प्यांच्या स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहेत. हिंदायानचे संयोजक आणि जग परिक्रमा करणारे पहिले आणि आतापर्यंतचे एकमेव भारतीय विष्णुदास चापके याप्रसंगी म्हणाले, आम्ही हिंदायान मोहीम सुरू करण्यामागे तीन उद्दिष्टे आहेत. पहिले उद्दिष्ट ऑलिम्पिकमध्ये २२ सायकलिंग इव्हेंट आहेत, ज्यात ६६ पदके आहेत. तथापि, गेल्या ६० वर्षात एकही भारतीय सायकलपटू भारताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी पात्र ठरलेला नाही. १९६४ ही शेवटची ऑलिम्पिक स्पर्धा होती, ज्यामध्ये चार सायकलपटूंनी भारताचे प्रतिनिधित्व केले होते. यानिमित्ताने भारतीय सायकलपटूस ऑलिम्पिक स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळू शकेल. दुसरे उद्दिष्ट आहे ते सशस्त्र दल आणि राज्य पोलिसांचे साहसी सायकलपटू सायकल शर्यतींमध्ये सहभागी होण्यासाठी अमेरिका, इंग्लंड आणि फ्रान्समध्ये जातात, कारण त्यांना अशा स्पर्धांसाठी भारतात कोणतेही व्यासपीठ उपलब्ध नाही. या निमित्ताने त्यांना हे व्यासपीठ उपलब्ध होऊ शकेल.

तिसरे उद्दिष्ट भारतात सायकलिंग संस्कृती विकसित करण्याची आणि त्यासाठी पायाभूत सुविधा निर्माण करण्याची नितांत गरज आहे. यामुळे कार्बन उत्सर्जन मोठ्या प्रमाणात कमी होण्यास आणि शाश्वत विकासासाठी मदत होईल. हिंदायान सायकल स्पर्धेचे पहिले पर्व ५ ते १९ फेब्रुवारी या कालावधीत नवी दिल्ली ते पुणे यादरम्यान यशस्वीरित्या झाले होते.

यावर्षी वर्ष २०२४ची ही स्पर्धा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेकाच्या ३५०व्या वर्धापनदिनाच्या पार्श्वभूमीवर होणार असून छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंती दिनी म्हणजेच १९ फेब्रुवारी २०२४ रोजी सिंहगड, पुणे येथे या स्पर्धेची सांगता होणार आहे. हिंदायान सर्वांसाठी खुले आहे. राईडची नोंदणी अधिकृतपणे सुरू झाली आहे. सायकलपटूंनी नोंदणी करण्यासाठी www.hindayan.in या संकेतस्थळास भेट द्यावी, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

# विकसित भारत संकल्प यात्रेचा शुभारंभ



**नंदुरबार : प्रतिनिधी**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली देशातील आदिवासी बहुल जिल्ह्यात माहिती, शिक्षण आणि संवादासाठी सुरू झालेल्या विकसित भारत संकल्प यात्रेच्या राज्यस्तरीय मोहिमेचा शुभारंभ राज्यपाल रमेश बैस आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी (दि. १५) हिरवा झेंडा दाखवून केला.

भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त आयोजित विकसित भारत संकल्प यात्रा या कार्यक्रमाचे उद्घाटन देशातील ७५ आदिवासी जिल्ह्यात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झारखंड येथील उलोहातू येथून करण्यात आले. या कार्यक्रमात राज्यपाल रमेश बैस व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे दृरदृश्य प्रणालीद्वारे नंदुरबार येथे आयोजित महोत्सवातून सहभागी झाले होते.

या वेळी आदिवासी विकास मंत्री डॉ. विजयकुमार गावित, मदत व पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन मंत्री तथा पालकमंत्री अनिल पाटील, जि. प. अध्यक्ष डॉ. सुप्रिया गावित, खासदार डॉ. हिना गावित, राज्यपाल यांच्या सचिव श्वेता सिंघल, आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे, विभागीय आयुक्त राधाकृष्ण गमे, जिल्हाधिकारी मनीषा खत्री उपस्थित होते.

# किल्ले बांधणी स्पर्धेचे बक्षीस वितरण

**उरण : बातमीदार**

जनसेवेतून आनंद देणाऱ्या वशेणी इतिहास संपादकीय मंडळाने शाळकरी मुलांच्या कलेला वाव देणे आणि दिवाळीचा आनंद लुटण्यासाठी वशेणी आणि पुनाडे गाव मर्यादीत किल्ले बांधणी स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेतला उदंड प्रतिसाद मिळाला असून ५२ जणांनी सहभाग नोंदवला.

विशेष म्हणजे सर्वच्या सर्व किल्ले हे मुलांनी माती पासून तयार केले होते. एक देखील बाजारात मिळणारा किल्ला नव्हता. या किल्ले बांधणी स्पर्धेचे बक्षीस वितरण बाल दिनाचे औचित्य साधून श्री



हनुमान मंदिर वशेणी येथे करण्यात आले.

या किल्ले बांधणी स्पर्धेचे परीक्षण मंडळाचे कार्यवाहक मच्छिंद्रनाथ म्हात्रे, संदेश गावंड आणि प्रविण ठाकूर यांनी केले होते. प्रथम क्रमांक स्वरा संदेश म्हात्रे (प्रतापगड), व्दितीय क्रमांक साई समाधान म्हात्रे (लोहगड), तृतीय क्रमांक अर्पित प्रविण पाटील (मुरूड जंजिरा), उत्तेजनार्थ दक्ष प्रेमनाथ पाटील (मुरूड जंजिरा), उत्तेजनार्थ वेदांत प्रविण ठाकूर (पुरंदर), लक्षवेधी पूर्वा प्रताप पाटील (कर्नाळा), लक्षवेधी आर्या कृष्णा पाटील (पन्हाळा), लक्षवेदी चित्रलेखा प्रदिप पाटील (तोरणा), लक्षवेधी रूपेश रोशन पाटील (प्रतापगड), विशेष सजावट निशा निलेश पाटील या सर्व सहभागी स्पर्धकांना मंडळाकडून भेटवस्तू देण्यात आले.

स्पर्धा यशस्वी होण्यासाठी सुरेंद्र म्हात्रे, किशोर म्हात्रे, डॉ. रवींद्र गावंड, संदेश गावंड, आदिनाथ पाटील यांचे विशेष योगदान मिळाले. बक्षीस वितरण कार्यक्रमास गणेश खोत, बळीराम म्हात्रे, पंढरीनाथ पाटील, महेश पाटील, ग्रामपंचायत सदस्य सुनील ठाकूर, अनंत पाटील, निसर्ग म्हात्रे, जगन्नाथ म्हात्रे, अनंत तांडेल, राम तांडेल, पुरूषोत्तम पाटील आदी उपस्थित होते.

# ठाण्यात फटाक्यांची आतषबाजी पडली महागात; तीनशेहून अधिक गुन्हे दाखल

**ठाणे : प्रतिनिधी**

जिल्ह्यातील ठाणे, कल्याण-डोंबिवली, भिवंडी, उल्हासनगर, अंबरनाथ आणि बदलापूर या शहरांमध्ये उच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन करीत दिवाळीनिमित्ताने फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली. या प्रकरणी ठाणे पोलिसांनी तीनशेहून अधिक गुन्हे दाखल केले आहेत. बुधवारी उशीरापर्यंत गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. पालिका आणि पोलिसांकडून ही सुमोटो कारवाई केली जात आहे.

मुंबई महानगरातील हवेचा दर्जा खालावलेला असून त्यात दिवाळी कालावधीत फटाके आतषबाजीमुळे हवेचा दर्जा आणखी खालावण्याची भिती व्यक्त होत होती. या पार्श्वभूमीवर मुंबई उच्च न्यायालयाने रात्री ८ ते १० या वेळेतच फटाके फोडण्यास परवानगी दिली होती, परंतु या वेळेनंतरही शहरात फटाक्यांची आतषबाजी सुरूच असल्याचे समोर आले होते. उच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर ठाणे पोलिसांकडून तीन दिवसांपासून सुमोटो गुन्हे दाखल करण्यात येत आहे.

रात्री १० वाजेनंतर पोलिसांची पथके शहरात गस्त घालत असून यादरम्यान फटाके फोडताना आढळून येणाऱ्या व्यक्तींवर गुन्हे दाखल केले जात आहे, तसेच रात्री उशीरापर्यंत फटाके फोडणाऱ्यांविरोधात पालिकेकडे तक्रारी प्राप्त होत असून त्या तक्रारी पालिका पोलिसांकडे पाठवित आहे. त्यानुसारही गुन्हे दाखल केले जात आहेत. काही ठिकाणी दंडात्मक कारवाई केली जात आहे. लहान मुले फटाके फोडताना आढळले तर त्यांच्या पालकांना समज दिली जात आहे.

# पं. नेहरू आणि बिरसा मुंडा जयंतीदिनी अभिवादन

**नवी मुंबई : बातमीदार**

स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू जयंतीनिमित्त मंगळवारी (दि. १४) नवी मुंबई महापालिका मुख्यालयात प्रतिमापूजन करून अधिकारी, कर्मचारीवृंदाच्या उपस्थितीत आदरांजली अर्पण करण्यात आली.

नेहरूजींचा जन्मदिन हा 'बालदिन' म्हणून देशभरात साजरा केला जात असून नवी मुंबई महापालिका समाजविकास विभागाच्या वतीने १८ ते २४ नोव्हेंबर या कालावधीत आठही विभाग कार्यालय क्षेत्रात मध्यवर्ती ठिकाणी शालेय विद्यार्थ्यांकरिता विशेष दिवाळी शिबिर आयोजित करण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे बुधवारी (दि. १५) आदिवासी समाजातील दूरदर्शी स्वातंत्र्यसेनानी बिरसा मुंडा यांच्या जयंतीदिनाचे औचित्य साधून नवी मुंबई महापालिका मुख्यालयातील ॲम्फिथिएटर येथे प्रतिमापूजन करून बिरसा मुंडा यांच्या प्रेरणादायी स्मृतींना आदरांजली अर्पण करण्यात आली.

१५ नोव्हेंबर १८७५मध्ये जन्म झालेल्या बिरसा मुंडा यांनी इंग्रजांकडून होणारे अत्याचार पाहून इंग्रज सरकारच्या अन्यायाविरोधात १८९५च्या सुमारास लढा पत्करला. इंग्रजांनी अटक केल्यानंतर तुरुंगात अन्वनीत छळ होऊनही त्यांनी आपला लढा काही सोडला नाही. पाणी, जंगले व जमीन ही नैसर्गिक संसाधने वाचविण्यासाठी ते नेहमी आग्रही राहिले. त्यासोबतच सामाजिक परंपरांची जपणूक व महिलांचे संरक्षण याविषयी त्यांनी आग्रही भूमिका घेत काम केले.

अशा समाजाने जननायक म्हणून गौरविलेल्या आदिवासी समाजक्रांतीचे जनक स्वातंत्र्यसेनानी बिरसा मुंडा जयंतीनिमित्त त्यांस नवी मुंबई महापालिकेत भावपूर्ण अभिवादन करण्यात आले.



# मोहोपाडा आळंदी पायी दिंडी

**मोहोपाडा :** वारकरी सांप्रदायिक खालापूर-पनवेल पायी कोकण दिंडी ट्रस्ट मोहोपाडा आळंदी देवाची यांच्या वतीने आळंदी देवाची येथे पायी दिंडीचे आयोजन १ ते ११ डिसेंबरपर्यंत करण्यात आले आहे.

वारकरी सांप्रदायाचे आद्य प्रसारक रसायनीतील बाळाराम महाराज कांबेकर यांचे चिरंजीव हभप गुरुवर्य विनायक महाराज कांबेकर व हभप बाळकृष्ण महाराज पाटील चांभार्ली यांच्या मार्गदर्शनाखाली १ डिसेंबर रोजी आद्य क्रांतीवीर वासूदेव बळवंत फडके व विठ्ठल रखुमाई मंदिर शिरढोण येथून प्रस्थान होईल. यानंतर शनिवार २ डिसेंबर नारपोली, ३ डिसेंबर मोहोपाडा असे प्रस्थान करीत पायी दिंडी रविवार १० डिसेंबर रोजी आळंदीत दाखल होईंल. १२ डिसेंबर रोजी समाधी सोहळ्यानिमित्त काल्याचे किर्तन होईल.

# तळोजातील निराधार महिलांनी अनुभवली जंगल सफारी

**नवी मुंबई : बातमीदार**

बेलापूर येथे असलेल्या व्हॅली पार्कमध्ये दिपावलीनिमित्त तळोजा येथील ज्योथी अनाथाश्रमातील निराधार महिलांनी जंगल सफर अनुभवली. बेलापूर येथील निसर्गमित्र संघटना पुनर्वसु फाउंडेशनतर्फे या सफरीचे आयोजन केले होते. या वेळी महिलांना विविध पक्ष्यांची, प्राण्यांची, सापांच्या विविध जातींची, झाडांची माहिती देण्यात आली.

नवी मुंबई हे आधुनिक शहर म्हणून गणले जात असले तरी शहराला लागून असलेल्या डोंगर रंगांमुळे आजही निसर्ग शाबूत आहे. शहरातील बेलापूर विभाग हा निसर्गरम्य गणला जातो. येथे व्हॅली पार्क म्हणून हिरवळीचा पट्टा म्हणजेच जंगली



भाग शाबूत आहे. हा भाग पक्षी तसेच सरपटणाऱ्या प्राण्यांसाठी प्रसिद्ध आहे. पुनर्वसु फाउंडेशन ही युवकांची संस्था निसर्गासोबत समरस होऊन या भागाची काळजी घेत आहे. फाउंडेशनचे प्रितम भुसाणे, अनिकेत गायकवाड, संजय रणपिसे या तिघांनी महिलांना मार्गदर्शन केले. सापाची माहिती असलेल्या फलकावरील माहिती दाखवून विषारी, बिनविषारी सापांन बद्दल असलेले समज गैरसमज दूर केले. त्यांना जंगलाच्या पायवाटा दाखवून, वाटेत येणाऱ्या फुलझाडांची, औषधी वनस्पती तसेच पक्ष्यांची माहिती देण्यात आली.

पुनर्वसु फाउंडेशनच्या नजरेतून जंगल दाखवल्यामुळे त्याची जंगला बद्दल असलेली भीती दूर झाली. ती त्यांनी बोलून देखील दाखवली. काही रोपे या महिलांना देण्यात आली. रोपे लावताना काय काळजी घ्यावी, ती जागवण्यासाठी काय करावे हेदेखील या महिलांना सांगण्यात आले.

**पान १ वरुन**

## सर्वांच्या स्वप्नातील महाराष्ट्र घडवणार -मुख्यमंत्री

आदिवासी बांधवांना स्वातंत्र्याची, स्वाभिमानाची वाट दाखवणाऱ्या भगवान बिरसा मुंडा यांच्या नावे राज्यातील आदिवासी बहुल १७ जिल्ह्यांतील सर्व आदिवासीवाडे, पाडे मुख्य रस्त्याने जोडण्यासाठी भगवान बिरसा मुंडा जोड रस्ते योजना राबवित आहोत. एकूण पाच हजार कोटी रुपयांची ही योजना असून सहा हजार ८३८ किमी लांबीचे रस्ते या योजनेतून बांधले जाणार आहेत. आदिवासी विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाचे गुरुकुल असणाऱ्या आश्रमशाळांचे बळकटीकरण करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यातील २५० शासकीय आदिवासी आश्रमशाळांना आदर्श आश्रमशाळा करण्याचा निर्णयही शासनाने घेतला असल्याचेही त्यांनी सांगितले.

राज्यपाल बैस म्हणाले, स्वातंत्र्यानंतर प्रथमच, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्य लढ्यातील आदिवासी समुदायांचे योगदान साजरे करण्यासाठी आणि त्यांना प्रेरणा देण्यासाठी १५ नोव्हेंबर हा दिवस आदिवासी जनजातीय गौरव दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यावर्षी आदिवासी विकास विभागाने १५ ते १७ नोव्हेंबर या कालावधीत हा गौरव दिवस व सांस्कृतिक महोत्सव साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आदिवासी विकासासाठी अनेक योजना सुरू केल्या आहेत. राज्यात ४९९ सरकारी आश्रमशाळा आणि ५३८ सरकारी अनुदानित आश्रमशाळा आहेत, तसेच ७३ 'नमो शाळा' आहेत, ज्या विज्ञान केंद्र म्हणून आज कार्यरत आहेत. सुपर-५० प्रशिक्षण कार्यक्रमांद्वारे आदिवासी विद्यार्थ्यांना जेईई आणि एनईईटी परीक्षांसाठी तयार केले जात आहे. परदेशात उच्च शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्तीही दिली जात आहे. मेस्कोसारख्या संस्थांच्या माध्यमातून प्रशिक्षण केंद्रे चालवत आहे, जिथे त्यांना पोलीस दल आणि सशस्त्र दलात भरतीसाठी तयार केले जात आहे, तसेच महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळातर्फे आदिवासी युवकांसाठी ड्रायव्हिंग प्रशिक्षण कार्यक्रम राबविला जात आहे. आमचे तरुण धनुर्विद्या आणि इतर खेळांमध्येही चांगली कामगिरी करीत आहेत. आदिवासी विकास आयुक्तालय साहसी क्रीडा उपक्रम आणि प्रशिक्षणाद्वारे युवा नेतृत्व कार्यक्रमात उत्कृष्टतेला प्रोत्साहन देण्यासाठी 'मिशन शौर्य' अभियान राबवत आहेत.

# मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष शिबिर

## नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत आयोजन

**नवी मुंबई : बातमीदार**

दिवाळीच्या सुट्टीमध्ये शिबिराच्या माध्यमातून मुलामुलींचे व्यक्तिमत्व घडविण्यासाठी व त्यांचा बौद्धिक स्तर उंचविण्यासाठी नवी मुंबई महापालिका समाजविकास विभागाच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांकरिता विशेष दिवाळी शिबिर १८ ते २४ नोव्हेंबर या कालावधीत आयोजन कारण्यात आले आहे.

या शिबिरात व्यक्तिमत्व विकास, योगा व फिटनेस वर्ग, हस्तकला वर्ग, वक्तृत्व विकास, चित्रकला वर्ग, नाट्य वर्ग, नृत्य वर्ग, बालपुस्तक वाचन असे उपक्रम होणार आहे. १८ ते २४ नोव्हेंबर या कालावधीत आठही विभागातील मध्यवर्ती ठिकाणी महापालिकेच्या शाळा सभागृहांमध्ये हे शिबिर दररोज साधारणत: दोन तास होणार आहे.

आठ विभाग कार्यालय क्षेत्रातील शिबिराची ठिकाणे व तेथील वेळा समाजविकास विभागाच्या वतीने जाहीर करण्यात आल्या आहेत. याबाबतच्या अधिक माहितीसाठी बेलापूर, नेरूळ, वाशी, तुर्भे विभागातील मुलांनी दादासाहेब भोसले यांच्याशी (९३७२१०६९७६, ९८१९५५५२२०) तसेच कोपरखैरणे, घणसोली, ऐरोली, दिघा विभागातील मुलांनी दशरथ गंभीरे यांच्याशी (९७०२३०९०५४, ९००४७६१६४०) संपर्क साधावा असे सूचित करण्यात येत आहे.

# मुंबई-पुणे महामार्गावरील अपघातात चार जण जखमी

**पनवेल : वार्ताहर**

मुंबई-पुणे महामार्गावरील बोर्ले टोलनाक्याजवळ रात्री पावणे बाराच्या सुमारास एका होंडा कारच्या भीषण अपघातात चार जण जखमी झाले आहेत.



होंडा सिटी कार (एमएच एबी ८४२८) कार घेऊन चालक प्रवाशांना घेऊन द्रुतगती महामार्गावरून मुंबई बाजूकडे जात असताना चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटून साईड रेलिंगला ठोकर मारून ती कार मधल्या लेनवर आली. या अपघातात अशोक रामचंद्र गवई हे गंभीर झाले असून अशोक मोरे, विनोद तळेगावकर आणि अशीच खान हे किरकोळ जखमी झाले आहेत. अपघाताची माहिती मिळाल्यानंतर पळस्पे मोबाईलवरील स्टाफ आणि आयआरबी स्टाफ घटनास्थळी दाखल होत अपघातग्रस्त वाहन खासगी टोविंगच्या सहाय्याने बाजूला करून वाहतूक सुरळीत करण्यात आली.

# पनवेलचे माजी नगरसेवक रामजीभाई बेरा यांचे निधन

**पनवेल** : महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र. ५चे माजी नगरसेवक रामजीभाई बेरा यांचे बुधवारी (दि. १५) वयाच्या ५३व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. मितभाषी, दांडगा जनसंपर्क असणारे रामजीभाई एक यशस्वी उद्योजक म्हणूनही प्रसिद्ध होते. समाजातील एक दानशूर व्यक्ती म्हणून त्यांचा नावलौकिक होता. त्यांच्या निधनाने खारघरमध्ये हळहळ व्यक्त केले जात आहे. खारघर वैकुंठ धाम स्मशानभूमी, सेक्टर १४ येथे गुरुवारी (दि. १६) दुपारी ३ वाजता अंतिम संस्कार होणार आहे.



त्यांच्या पश्चात त्यांची आई, पत्नी, दोन मुले, एक मुलगी व पाच भावंडे आहेत. त्यांच्या निधनाची माहिती मिळाताच आमदार प्रशांत ठाकूर यांनी त्यांना श्रद्धांजली वाहिली.

# दिपावलीनिमित्त व्यापाऱ्यांचे स्नेहसंमेलन





**उरण : वार्ताहर**

उरण व्यापारी असोशिएशन व महेश बालदी मित्र मंडळ यांच्या वतीने मंगळवारी (दि. १४) तेरापंथ हॉल वाणीआळी उरण येथे व्यापारी असोशिएशनचे अध्यक्ष तथा आमदार महेश बालदी यांच्या मार्गदर्शनाखाली दिपावली मिलन कार्यक्रम झाला. आमदार प्रशांत ठाकूर याची उपस्थिती लाभली.

उरण शहरातील व्यापारी असोशिएशन तथा मान्यवर यांनी उपस्थित राहून आमदार महेश बालदी यांना शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमास आमदार महेश बालदी, भाजप उरण तालुका अध्यक्ष तथा नगरसेवक रवी भोईर, माजी उपनगराध्यक्ष जयविन कोळी, भाजप उरण शहर अध्यक्ष तथा नगरसेवक कौशिक शाह, माजी नगरसेवक राजू ठाकूर, उरण शहर भाजप युवा अध्यक्ष निलेश पाटील, मनन पटेल, तनसुख जैन, उरण व्यापारी असोशिएशनचे हितेश शाह, हस्तीमल मेहता, अजित भिंडे, भाजप उरण तालुका उपाध्यक्ष प्रकाश ठाकूर, मनोहर सहतिया, उरण नगर परिषद माजी उपनगराध्यक्ष जयविन कोळी, सुनील पेडणेकर, नवीन राजपाल जसिम गॅस, भाजप उरण तालुका महिला अध्यक्ष राणी म्हात्रे, धुतुम माजी सरपंच धनाजी ठाकूर, प्रदीप मेहता, पुरुषोत्तम सेवक, कुणाल शिसोदिया, जसखार माजी सरपंच दामूशेठ घरत, रणछोड चंदात, डॉ. सुरेश पाटील, डॉ. सत्यनारायण ठाकरे, डॉ. विकास मोरे, निखील माळी, अश्विन पटेल, हार्दिक पटेल, प्रेम मढवी, मनोज ठाकूर, गोरक्षनाथ घरत, दीपक दळी, निलेश कदम, मधुकर पेडणेकर, नयन डांगी, परेश वैवडे, गिरीश परीहारीया, शैलेश वैवडे, वासुदेव आर्य, पंकज समेळ, लक्ष्मण सेवक, रौनक सेवक, गौरव सेवक, रोशनलाल मेहता, बासीद मुकरी, अक्षय घरत, सुरज कडू, विशाल ठाकूर, बाबूलाल शंखला, बाबूलाल वर्मा, परेश तेरडे, मुरजीभाई राजपूत, कमल डांगी, सुरेश डांगी, जिगर ठक्कर, अभिषेक जैन आदी उपस्थित होते.

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दिवाळीनिमित्त व्यापारी नव वर्षानिमित्ताने पनवेल येथील व्यापाऱ्यांचे स्नेहसंमेलनाचे आयोजन शहरातील बालाजी बँक्वेट हॉलमध्ये करण्यात आले होते. मंगळवारी (दि. १४) झालेल्या या कार्यक्रमाला मावळ लोकसभा मतदार संघाचे निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर, उरण मतदार संघाचे आमदार महेश बालदी यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

या मेळाव्यातून व्यापाराच्या समस्या सोडविण्यासाठी आणि धावपळीच्या जगात व्यापाऱ्यांनी एकत्र यावे या उद्देशाने स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होत.

या वेळी या स्नेहसंमेलनाला माजी सभागृह नेते परेश ठाकूर, शहराध्यक्ष अनिल भगत, पनवेल महानगर पालिकेचे माजी नगरसेवक नितीन पाटील, नितीन मनोत, व्यापारी संघटनेचे अध्यक्ष नारायण पेंडकर, व्यापारी सेल संयोजक विनोद जैन, उरण शहर भाजप अध्यक्ष रवी भोईर, करंजाडे ग्रामपंचायतीचे सरपंच मंगेश शेलार यांच्यासह इतर मान्यवर आणि विविध व्यापारी संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर कारचा अपघात; महिला जखमी

**पनवेल : वार्ताहर**

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील खांदेश्वर पोलीस ठाणेहद्दीत एका कारचा अपघात झाला असून या अपघातात पादचारी महिला महिला जखमी झाली आहे.

मारुती सेलेरिओ कार (एमएच ०१ डीबी २३८२) वरील चालक दिलीप उदय राणी (वय ४४) हे त्यांचे ताब्यातील कार चालवीत घेऊन मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरून मुंबई बाजूकडे जात असताना किमी २/७०० येथे आले असता अर्चना महादेव माने (वय-४०, रा. विचुंबे) ही पादचारी महिला मुंबई लेन वरून पुणे लेन कडे पायी चालत रोड क्रॉस करत असताना कारचालकाचा गाडीवरील ताबा सुटून अर्चना महादेव माने यांना ठोकर लागून गंभीर दुखापत अपघात झाली आहे.

अपघातामध्ये महिला गंभीर दुखापत झाली असून त्यांना उपचाराकरिता एमजीएम हॉस्पिटल कामोठे येथे खाजगी वाहनाने दाखल करण्यात आले आहे. अपघातग्रस्त वाहन रोडचे बाजूला करून वाहतूक सुरळीत चालू आहे. अपघाताचे ठिकाणी पळस्पे मोबाईल वरील स्टाफ तसेच व आयआरबी स्टाफ हजर होते. या अपघाताची नोंद खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.



**पनवेल : मल्हार चॅनेलचे कॅमेरामन संकेत भोईर यांना माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या.**





**पनवेल : दिवाळी सणाच्या शुभ मुहूर्तावर नवीन उद्योग सुरू करण्याची परंपरा आहे. या परंपरेला अनुसरुण आरकेबी हे राजेंद्र कांतीलाल बांठीया ज्वेलर्स पनवेल शहरातील टपाल नाका येथे नव्याने सुरू झाले आहे. या ज्वेलर्सच्या दुकानाला भाजपचे मावळ लोकसभा निवडणुक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर आणि माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट देत राजेंद्र बांठीया यांचे अभिनंदन केले. या वेळी भाजपचे प्रदेश सदस्य सिद्धार्थ बांठीया, पनवेल शहर खजिनदार संजय जैन यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.** (छाया : प्रफुल्ल कांबळे)

## तडीपार गुन्हेगार पोलिसांच्या ताब्यात

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल परिसरातून तडीपार असलेला एक गुन्हेगार नवीन पनवेल फिरत असल्याची माहिती पोलिसांना मिळताच त्यांनी या आरोपीला ताब्यात घेतले आहे.

खांदेश्वर पोलीस ठाण्याचे रेकॉर्डवरील तडीपार असलेला व्यक्ती रोहित गोपाळ गाडे (वय ३० वर्षे, रा. विचुंबे) हा नवीन पनवेल सिग्नलच्या रिक्षा स्टॅन्ड येथील पेट्रोल पंप जवळ उभा आहे. अशी गुप्त बातमीदारामार्फत खात्रीशीर वर्णनासह बातमी मिळाल्याने, पनवेल शहर पोलीस ठाणे, गुन्हे शाखेच्या पथकातील उपनिरीक्षक विनोद लभडे यांनी पोलीस पथकासह नवीन पनवेल सिग्नलच्या रिक्षा स्टॅन्ड येथील पेट्रोल पंप जवळ हद्दपार असलेला रोहित गोपाळ गाडे याला पुढील कारवाईकरीता पोलीस ठाण्यात आणले आहे.

पोलीस ठाण्याचा अभिलेख चेक करता, त्यास पोलीस उप आयुक्त परि-२, पनवेल यांचेकडील दोन वर्षे कालावधीकरीता करण्यात आलेल्या हद्दपार आदेशान्वये नवी मुंबईसह रायगड, ठाणे जिल्ह्यातून हद्दपार केले असताना, तो हद्दपारीचे कालावधीमध्ये नवीन पनवेल सिग्नलच्या रिक्षा स्टॅन्ड येथील पेट्रोल पंप जवळ येवून त्याने हद्दपारी आदेशाचा भंग केला असताना मिळून आला. म्हणून त्याच्या विरुध्द कारवाई करण्यात आली.

ही कामगिरी वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांचे मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक विनोद लभडे, हवालदार अविनाश गंथडे, यशवंत झाजम, महेंद्र वायकर, कुडावकर व नाईक अशोक राठोड यांनी केली.



**पनवेल : सुकापूर येथील बालाजी सिंफनी (फ्लुटीना) सोसायटीमधील लहान मुलांनी प्रतापगड किल्ल्याची प्रतिकृती तयार केली आहे.** (छाया : उमेश लुम्पटकी)



**पनवेल : प्रसिद्ध कलाकार, मधुबनी पेंटिंगच्या डिझायनर आणि ट्रेनर मुन्नी कुमारी मीनू यांनी राज्य व कलामणी पुरस्कारप्राप्त मिथिला पेंटिंग आमदार प्रशांत ठाकूर यांना प्रदान केली. या पेंटिंगमध्ये भगवान ब्रह्मा आणि विष्णू यांच्या उपस्थितीत शिव आणि पार्वतीचा विवाह दर्शविला आहे. या वेळी मुन्नी कुमारी मीनू सोबत त्यांचे पती डॉ. अर्जुन कुमार (निवृत्त प्राध्यापक, डेअरी मॅनेजमेंट), मुली खुशबू, प्रिया, कायस्थ, प्रियांका आणि रामशेठ ठाकूर आंतरराष्ट्रीय क्रीडा संकुलातील लेखा सहाय्यक मुन्मी नदाफ आदी उपस्थित होते.**



**पनवेल : दिवाळीनिमित्त भाजपचे पळस्पे जिल्हा परिषद विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे यांनी उसर्ली आदिवासी वाडी येथे महिलांना साडी व दिवाळी फराळ वाटप केले.**

राम प्रहर
वाचनीय बातम्या आणि जाहिरातींसाठी वाचा

## दिवाळी पहाटमध्ये हिंदी आणि मराठी गीतांची सुरेल मैफील



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्वर-संस्कार प्रस्तुत दिवाळी पहाट या हिंदी आणि मराठी गीतांच्या सुरेल मैफीलीने नवीन पनवेलकरांची पहाट झाली.

उत्कर्ष सांस्कृतीक कला आणि क्रिडा मंडळच्या वतीने दरवर्षी दिवाळी पहाट या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. त्याअंतर्गत यंदाच्यावर्षी आयोजीत दिवाळी पहाट कार्यक्रमात गायक अॅडव्होकेट सुरेखा भुजबळ, मधुसूदन ओझा, निलेश गायकवाड, स्वाती हरवंदे यांनी सुरेल गिते सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. त्यांना वादक राजू भोईर, प्रवीण कदम, कृष्णा साठे, सूर्यकांत गायकवाड, गणेश दळवी, योगेश गायकवाड यांनी साथ दिली. आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी आणि माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांनी या कार्यक्रमाला भेट देत दिवाळी पहाट कार्यक्रमाचा आस्वाद घेतला.

नवीन पनवेल मधील के. आ. बांठीया हायस्कूलमधील सभागृहात झालेल्या या कार्यक्रमावेळी भाजपचे रायगड लोकसभा ओबीसी मोर्चा प्रमुख अॅड. मनोज भुजबळ, माजी नगरसेवक अजय बहिरा, माजी नगरसेविका अॅड. वृषाली वाघमारे, सुशीला घरत, जय भारतीय कामगार संघटनेचे अध्यक्ष कामगार नेते जितेंद्र घरत, महिला मोर्चाच्या माजी शहर अध्यक्षा वर्षा नाईक, अॅडव्होकेट जितेंद्र वाघमारे, कामगार नेते रवी नाईक, जगदीश घरत, विजय म्हात्रे, प्रिती भुजबळ, स्मीता वाणी, के. डी. हात्रे, सुधीर कांडपीळे, राकेश भुजबळ आदी उपस्थित होते.



**पनवेल : दिवाळीनिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची शिवाजी दुर्गे, न्हावे ग्रामपंचायतीचे सरपंच विजेंद्र पाटील, हरेश म्हात्रे, न्हावे ग्रामपंचायत सदस्य सागर ठाकूर, अतुल ठाकूर, 'रयत'चे कारंडे सर, माजी नगराध्यक्ष मदन कोळी, निलेश खारकर, धिरज ओवळेकर, शैलेश भगत आदींनी भेट घेत आशीर्वाद घेऊन दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या.**



**पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांना भारती सामाजिक संस्थेच्या वतीने आयोजित उतर भारतीय नागरिकांच्या छटपूजेचे निमंत्रण देण्यात आले. छटपूजा उलवे नोड सेक्टर ९ येथील तलाव येथे होणार आहे. निमंत्रण देतेवेळी भारती सामाजिक संस्थाचे अध्यक्ष राज कुमार सिंग, उपाध्यक्ष विकास कुमार सिंह, सचिव राजीव रंजन, खजिनदार मनोज कुमार मौर्य, युवा नेते गौतम कुमार, सामाजिक कार्यकर्ते एससी मिश्रा, मनीष कुमार, संजीव ठाकूर, अभिषेक कुमार आदी उपस्थित होते.**

## तोरणा गड साकारलेल्या कट्टा परिवाराचे कौतुक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांनी उभारलेले किल्ले हे आजच्या पिढीसाठीही प्रेरणादायी आहेत. त्यानुसार पनवेलमधील कट्टा परिवाराच्या वतीने विरुपाक्ष मंदिराजवळ किल्ले तोरणा गड साकारला आहे. या किल्ल्याला भाजपचे मावळ लोकसभा निवडणुक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांनी मंगळवारी (दि. १४) भेट देत महाराजांचे विचार कट्टा परीवाराच्या माध्यमातून तरुण पिढीपर्यंत पोहचत असल्याबद्दल कट्टा परिवाराचे कौतुक केले.

विरूपाक्ष मंदिरासमोर कट्टा परिवार पनवेलतर्फे २०२० पासून अनेक तरुण मुलंमुली मिळून किल्ला बनवण्याची परंपरा जोपासत आहेत. गेल्या वर्षीपासून छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मापासून ते त्यांनी जिंकलेल्या क्रमवार किल्ल्याची प्रतिकृती साकारण्याचा प्रयत्न करत आहेत. गेली चार वर्षे आमदार प्रशांत ठाकूर कौतुकाची थाप द्यायला कट्टा परिवाराच्या किल्ल्याच्या प्रतिकृतीवर येऊन तरुणांचे मनोबल वाढवत असतात. यावर्षी साकारलेल्या किल्ले तोरणाच्या प्रतिकृती वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देत त्यांचे कौतुक केले.

या वेळी माजी नगरसेविका रूचिता लोंढ, कट्टा परिवाराचे शिवभक्त सौरभ रामधरणे, अनिमेष पटवर्धन, प्रभंजन गाडगीळ, अनिमेष ओझे, निखिल खोंड, अमेय भातखंडे, सुमेध गाडगीळ, तन्मय समेळ, पूजा लोंढे, कोमल कोळी, मधुरा गोडबोले, अथर्व गोखले, प्रवीण तांबोळी, ऐश्वर्या शेडगे, सुरभी खरे, सोहन जोशी, अवधूत जोशी, निशांत शेड्गे उपस्थित होते.




## संपादकीय


# अमेरिकी शिक्षणाचे स्वप्न

उच्च शिक्षणासाठी अमेरिकेत जाणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांच्या संख्येत मोठी वाढ झाली आहे हे आपल्याला सांगण्यासाठी खरे तर कुठल्याही सर्वेक्षणाची गरजच नाही. आपल्या अवतीभवतीच्या समाजात आपल्याला हे ठळकपणे जाणवतेच आहे. किंबहुना, आपल्या अपत्याला अमेरिकेत उच्च शिक्षणासाठी पाठवणे हे आज जवळपास प्रत्येक मध्यमवर्गीय भारतीय कुटुंबाचे स्वप्न असते असे म्हटले तर वावगे ठरू नये. याची परिणती म्हणजे २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात २ लाख ६८ हजार ९२३ भारतीय विद्यार्थी अमेरिकेत गेले असून हा आजवरचा उच्चांक आहे.

**अलीकडच्या काळात आंतरराष्ट्रीय स्तरावरची सर्वाधिक लक्ष वेधून घेणारी घटना म्हणून इस्रायल-हमास युद्धाकडे पाहिले जाते. त्यावेळी या युद्धाविषयीच्या भूमिकेवरून अवघे युद्ध दुभंगलेले दिसले. एकेकाळी कुणाच्या फारशा खिजगणतीत नसलेल्या भारताच्या भूमिकेकडेही त्यावेळी सगळ्यांचे लक्ष होते. पत्रकारांनी अमेरिकेच्या एका लोकप्रतिनिधीला त्याविषयी प्रश्न विचारला असता, त्याने 'आमच्यादृष्टीने भारत फार महत्त्वाचा आहे' असे उत्तर दिले होते. भारताची वाढती लष्करी आणि आर्थिक ताकद हे जसे त्यामागचे एक कारण होते तसेच इतरही काही कारणे आहेत, ज्यामुळे अमेरिकेसाठी भारत हा महत्त्वाचा देश आहे. यापैकी एक महत्त्वाचे कारण म्हणजे अमेरिकेतील भारतीय विद्यार्थ्यांची वाढती संख्या. २०२१-२२ या मागील शैक्षणिक वर्षाच्या तुलनेत २०२२-२३ या वर्षात अमेरिकेतील भारतीय विद्यार्थ्यांची संख्या ३५ टक्क्यांनी वाढली आहे. कोरोना महामारीच्या काळात ही संख्या घटली होती हे इथे लक्षात येते. त्यानंतर गेली सलग तीन वर्षे अमेरिकेत शिकणाऱ्या परदेशी विद्यार्थ्यांच्या संख्येत भारतीय विद्यार्थ्यांचे प्रमाण विक्रमी राहिले आहे. यंदाच्या शैक्षणिक वर्षात एकुणात अमेरिकेतील परदेशी विद्यार्थ्यांच्या संख्येत १२ टक्क्यांची वाढ झाली असून या वाढलेल्या संख्येत ३५ टक्के विद्यार्थी भारतीय आहेत. गेल्या ४० वर्षांत पहिल्यांदा अमेरिकेतील परदेशी विद्यार्थ्यांच्या संख्येत एवढी मोठी वाढ झाली आहे. सध्या अमेरिकतील परदेशी विद्यार्थ्यांची संख्या दहा लाखांहून अधिक असून त्यात भारतीय विद्यार्थ्यांचे प्रमाण २५ टक्क्यांपेक्षा जास्त आहे. 'ओपन डोअर्स' या संस्थेने जाहीर केलेल्या एका अहवालात यासंदर्भातील आकडेवारी देण्यात आली आहे. यात विशेष नोंद घेण्याजोगी बाब म्हणजे १२ वर्षांनी भारताने यात चीनवर मात केली आहे. २००९-१० नंतर प्रथमच अमेरिकेतील भारतीय विद्यार्थ्यांची संख्या चीनपेक्षा जास्त ठरली आहे. यात पदव्युत्तर विद्यार्थ्यांच्या संख्येत ६३ टक्क्यांची वाढ दिसून आली असून पदवीसाठी गेलेल्या विद्यार्थ्यांच्या संख्येत १६ टक्क्यांची वाढ आहे. शिक्षण क्षेत्रात भारत आणि अमेरिका यांचे अत्यंत दृढ संबंध आहेत. गेली तीन वर्षे अमेरिकेतील चिनी विद्यार्थ्यांची संख्या घटत असून भारतीय विद्यार्थ्यांची संख्या वाढते आहे. हा चीन-अमेरिका यांच्यातील तणावाचा परिणाम असावा, असे मत तज्ज्ञ व्यक्त करतात. त्यामुळे चिनी विद्यार्थी ब्रिटन, कॅनडाकडे वळू लागले आहेत. 'शिक्षण हा भारत आणि अमेरिका यांच्यातील संबंधांचा आधारस्तंभ आहे. दोन्ही देशांतील विद्यार्थी एकमेकांसोबत शिकत आहेत. त्यांची ध्येये जोपासत आहेत आणि एकत्र सहकार्याने एक चांगले जग निर्माण करत आहेत', असे उद्गार अमेरिकेच्या फर्स्ट लेडी जिल बायडेन यांनी जूनमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अमेरिका दौऱ्याचे वेळी काढले होते. भारत व अमेरिका यांच्यातील शैक्षणिक संबंध यापुढे आणखी दृढ होतील, असे दिसते आहे.**

# माथेरानमध्ये पर्यटन हंगामास सुरुवात



पर्यटकांचे आवडते पर्यटनस्थळ असलेल्या माथेरानमध्ये पर्यटकांचा ओघ वाढू लागला आहे. यासाठी माथेरान पूर्णपणे सज्ज झाले आहे. पावसाळी पर्यटन हंगामामध्ये पर्यटकांनी माथेरानला तुफान पसंती दिली होती. तशीच पसंती हिवाळी पर्यटन हंगामामध्ये पहावयास मिळेल अशी चिन्ह आहेत. दिवाळीची सुटी पडताच पर्यटकांचा ओघ हळूहळू माथेरानकडे वाढू लागला आहे.

आशिया खंडातील सर्वांत लहान पण टुमदार पर्यटनस्थळ म्हणून माथेरानची ओळख आहे. मोटार वाहनांना बंदी असल्यामुळे वाहन वर्दळीचा प्रश्नच नाही, हॉर्नचा कर्कश आवाज नाही, कुठेच प्रदूषण नाही. एक प्रदूषणमुक्त मुक्त पर्यटनस्थळ म्हणून माथेरान नावारूपाला आले आहे. त्यामुळे पर्यटक माथेरानला पसंती देतात. इतर पर्यटनस्थळांपेक्षा आपला वेगळा ठसा या पर्यटनस्थळाने उमटवला आहे. घनदाट उंच झाडी, लाल मातीचे रस्ते ही माथेरानची खरी ओळख. अमेझॉनच्या जंगलाची प्रचिती येथे येते असे घनदाट जंगल. या पर्यटनस्थळावर फिरण्याचा एक वेगळा अनुभव पहावयास मिळतो त्यामुळे पर्यटक मोठ्या प्रमाणावर येथे भेट देतात.

पावसाळ्यात जून ते सप्टेंबर या चार महिन्यात मोठ्या प्रमाणात पर्यटक दाखल झाले होते. जून ते सप्टेंबरमध्ये १२० दिवसात तीन लाख ६३ हजार ६१३ पर्यटक आले होते त्यामुळे माथेरानचे पर्यटक तुफान बहरले होते. आता हिवाळी पर्यटनात दिवाळी सुटीत माथेरान मध्ये पर्यटकांची मांदियाळी पहावयास मिळत आहे. शुक्रवारपासून पर्यटक येणास सुरुवात झाली असून त्यांचा ग्राफ दिवसेंदिवस वाढत आहे. लक्ष्मीपूजन झाल्यानंतर पर्यटकांचा ओघ माथेरान मध्ये वाढू लागला आहे. सोमवारी पर्यटक मोठ्या संख्येने माथेरान मध्ये दाखल झाले आहेत. त्यामुळे टॅक्सी संघटनेची पर्यटकांना माथेरान मध्ये आणण्यासाठी लगबग सुरू झाली आहे. कुली, हातरीक्षावाले, घोडेवाले यांची धावपळ सुरू झाली असून हॉटेल, रेस्टॉरंट फुल दिसत आहे इतकेच काय तर लॉजिंगसुद्धा हाऊसफुल दिसत आहे.

४ नोव्हेंबर रोजी नेरळ-माथेरान मिनिट्रेन पॅसेंजर सेवा सुरू झाली तेव्हापासून आतापर्यंत मिनिट्रेनच्या सर्व फेऱ्या फुल जात आहेत. नेरळ-माथेरान मिनिट्रेनमुळे पर्यटकसंख्या वाढली आहे असे स्थानिकांमधून बोलले जात आहे. तर अमनलॉज-माथेरान शटल सेवा सुद्धा हाऊसफुल धावत आहे. मिनिट्रेनमुळे येथील पर्यटन बहरत आहे असे माथेरानकरांचे म्हणणे आहे.

माथेरानचे पर्यटन दिवसेंदिवस बहरत आहे. पावसाळी हंगामात मोठ्या प्रमाणात पर्यटक आले होते तसेच पर्यटक आता सुद्धा आले आहेत. सर्व दुकानदार इमानेइतबारे पर्यटकाना सेवा देत आहेत. पर्यटक वाढण्याचे मोठे कारण म्हणजे माथेरानकरांची इमानदारी आणि दुकानदार आणि रेस्टॉरंटवाल्यांची सेवा या दोन गोष्टी कारणीभूत ठरत आहेत, असे व्यापारी वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष राजेश चौधरी यांनी सांगितले.


**-संतोष खाडे**

# मराठी संत साहित्यातील विद्वान डॉ. निर्मलकुमार फडकुले

विचारवंत, शैलीदार वक्ते, ललितलेखक आणि समीक्षक. निर्मलकुमार फडकुले यांना वाणी आणि लेखणीचा वारसा घरातूनच मिळाला होता. वडील पंडित जिनदासशास्त्री फडकुले हे संस्कृततज्ज्ञ होते. धर्म, साहित्य आणि तत्त्वज्ञानावरील त्यांचे चाळीसहून अधिक ग्रंथ प्रकाशित आहेत. निर्मलकुमार फडकुले यांचे आजोबा पार्श्वनाथ गोपाळ फडकुले हे देखील संस्कृत पंडित होते. त्यांनीही ग्रंथलेखन केले आहे. आज डॉ. निर्मलकुमार फडकुले यांचा जन्मदिन आहे. त्यानिमित्त जाणून घेऊया त्यांच्याविषयी या लेखातून...

निर्मलकुमार फडकुले यांचे प्राथमिक शिक्षण सोलापुरातील जैन पाठशाळेत झाले. माध्यमिक शिक्षण त्यांनी मॉडेल इंग्लिश स्कूल व हरिभाई देवकरण प्रशाला, सोलापूर येथे घेतले. त्यांच्यावर शालेय वयातच संस्कृतच्या अध्ययनाचे, साहित्याचे आणि वक्तृत्व गुणांचे संस्कार झाले. त्यांच्या वडिलांच्या मार्गदर्शनामुळे त्यांच्यातील वक्ता आणि साहित्याचा अभ्यासक घडला. त्याविषयीच्या आठवणींची हृद्य नोंद त्यांच्या ललित लेखनांतून पाहायला मिळते.

प्राध्यापक म्हणून कार्यरत असताना आणि निवृत्तीनंतरही त्यांनी संपूर्ण महाराष्ट्रात तसेच गोमंतक, बंगळूरू, धारवाड, कारवार, इंदूर,



जयपूर, मीरत, बडोदे, दिल्ली, कोलकाता येथील उल्लेखनीय अशा व्यासपीठांवरून आपले विचार मांडले. केवळ मराठीतूनच नव्हे तर हिंदी भाषेतूनही त्यांनी अनेक व्याख्याने दिली. सामान्य श्रोत्यांपासून ते कविश्रेष्ठुमाग्रजांपर्यंत अनेक जाणकारांनी त्यांच्या शैलीदार आणि विचारसंपन्न वक्तृत्वाला पसंती दिली. मराठी वक्तृत्वाची एक ठसठशीत अशी मुद्रा त्यांनी श्रोत्यांच्या मनावर उमटवली. भावगर्भता आणि विचारप्रवणता यांचे अनोखे मिश्रण त्यांच्या वक्तृत्वात असे. विचार हा वक्तृत्वाचा आत्मा असतो. शब्द हे शरीर असते. तेही शोभिवंत आणि सुंदर असावे यासाठी साधना करावी लागते, ही प्रगल्भ जाणीव त्यांच्या विचारांनी ओथंबलेल्या उत्कृष्ट व्याख्यानांतून होत असे. त्यांच्या वक्तृत्वकळेला त्यांच्या समृद्ध व्यक्तिमत्त्वाचा, रसिकतेचा, विद्वत्तेचा स्पर्श असायचा. त्यात लय असायची, नाट्य असायचे, प्रसंगी वाणीला आलेला अभिनिवेशाचा मोहोर असायचा. आवाजात मधुर संगीत असायचे. त्यात मनःचक्षूसमोर चित्र उभे करण्याचे सामर्थ्य असायचे. त्यांच्या प्रसन्न वाणीला प्रबोधनाची धार असायची. ज्ञानोबांपासून तुकोबांपर्यंत, आगरकरांपासून सावरकरांपर्यंत, प्राचीन वाङ्‌मयापासून आधुनिक साहित्यापर्यंत अनेकविध विषयांना त्यांनी आपल्या अमोघ, असाधारण वक्तृत्वाने न्याय दिला.

'चिंतनशील प्रकृतीचा लेखक वाचकनिष्ठ असण्यापेक्षा विचारनिष्ठ असतो' हे त्यांच्या लेखनातून निरंतर जाणवत राहते.

**(साभार : मराठी विश्वकोष)**

## बदलते तंत्रज्ञान



### आता ई-मेलद्वारेही चालवता येणार व्हॉट्सअॅप अकाऊंट



व्हॉट्सअॅप जगभरातील अनेकजण वापरतात. व्हॉट्सअॅपही वापरकर्त्यांना नेहमी नवीन फिचर लाँच करत असते. आता सुरक्षेबाबत कंपनीने एक महत्त्वाचं अपडेट दिलं आहे. या फिचरमुळे वापरकर्त्यांना डबल सुरक्षा मिळणार आहे. यात तुम्हाला अॅप लॉगिनसाठी ई-मेल व्हेरिफिकेशनचा ऑप्शनही मिळणार आहे. आतापर्यंत आपल्याला फक्त फोन नंबरनेच लॉगिन करावं लागतं होतं, पण आता याची पद्धत बदलणार असून वापरत्यांसाठी आणखी एक ऑप्शन मिळणार आहे.

W-BetaInfoच्या अहवालानुसार नवीन फीचर बीटा अपडेटवर जारी करण्यात आले आहे. WhatsAppच्या Android २.२३.२४.१० अपडेट व्हर्जनवर पडताळणीसाठी 'ई-मेल पत्ता' हा दुसरा पर्याय म्हणून जोडला आहे. सध्या हे फीचर व्हॉट्सअॅपच्या बीटा टेस्टर्ससाठी उपलब्ध आहे.

२.२३.२४.९ आणि २.२३.२४.८ व्हर्जनवर काम करणाऱ्या काही लोकांना नवीन मार्गाने लॉग इन करण्याची संधीही मिळत आहे. ईमेल पडताळणी फिचरबद्दल काही गोष्टी जाणून घेणे महत्त्वाचे आहे. अगोदर ई-मेल हा व्हॉट्सअॅप चालवण्याचा दुसरा पर्याय आहे. याचा अर्थ असा नाही की तो फोन नंबर बदलेल. व्हॉट्सअॅप खात्यांसाठी फोन नंबर हा डीफॉल्ट पडताळणी पर्याय असेल.

ई-मेल पडताळणी हे एक पर्यायी फिचर असल्याने ते वापरायचे की नाही हे वापरकर्त्यांवर आहे. तुम्ही उत्तम गोपनीयता आणि सुरक्षिततेसाठी हे फिचर वापरू शकता. फोन नंबर ही एक अतिशय खासगी गोष्ट आहे आणि तो व्हॉट्सअॅपवर वापरताना अनेकांना त्रासाचे होते. असे काहीजण आता ई-मेल पडताळणीचा वापर करून वापरकर्ता अनुभव सुधारू शकतात.

तुम्ही व्हॉट्सअॅपचे बीटा व्हर्जन चालवत असाल, तर तुम्ही ईमेल पडताळणी फिचर शोधू शकता. यासाठी तुम्हाला व्हॉट्सअॅपच्या सेटिंगमध्ये जावे लागेल. यानंतर अकाउंट ऑप्शनवर जा आणि ई-मेल अॅड्रेस तपासा. जर ई-मेल अॅड्रेस पर्याय दिसत असेल तर तुम्ही तुमचा ई-मेल टाकून पडताळणी प्रक्रिया पूर्ण करू शकता.

# मराठी कलावंत डॉ. श्रीराम लागू

आज डॉ. श्रीराम लागू यांचा जन्मदिवस. डॉ. लागू यांचा जन्म १६ नोव्हेंबर १९२७ साली महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यामध्ये झाला. इएनटी सर्जन म्हणून त्यांच्या वैद्यकीय कारकीर्दीची सुरुवात झाली होती, परंतु एक अभिनेता म्हणून मराठी रंगभूमीवरील आणि हिंदी-मराठी सिनेमाजगतातील त्यांच्या कर्तृत्वाचा पसारा प्रचंड आहे.

डॉ. श्रीराम लागू पुण्यातील भावे हायस्कूलमध्ये शिकत होते. या शाळेमध्ये नाटकावर विशेष लक्ष दिले जाई. डॉक्टरांबद्दल असे म्हटले जाते की, लहानपणीच ते अनेकांची नक्कल करायचे. हे पाहून त्यांच्या अवतीभवतीची बरीचशी मंडळी त्यांच्या आई-बाबांना हा एक दिवस खूप चांगला अभिनेता होईल असे म्हणत असत. डॉक्टरांबद्दल एक असाही किस्सा सांगितला जातो की, त्यांना एकदा त्यांच्या शिक्षकांनी तुला नाटकात काम करायचे आहे असे सांगितले. लागूंनीही जोरदार तयारी केली, मात्र प्रत्यक्ष जेव्हा रंगमंचावर उतरले तेव्हा ते प्रचंड घाबरले होते, पण त्याही परिस्थितीत त्यांनी सादरीकरण केले. त्यांच्या अभिनयाची प्रशंसाच झाली. लागूंबाबत असेही म्हटले जाते की, त्यांना स्वतःचेच नव्हे तर आपल्या सोबतच्या सहकलाकारांचेही संवाद तोंडपाठ असायचे.

डॉ. लागू मुळातच त्यांच्या अभ्यासात खूप हुशार होते. असे असूनही त्यांचे अभिनयाचे वेड त्यांना स्वस्थ बसू देत नव्हते. मेडिकल कॉलेजला गेल्यानंतरही त्यांनी अभिनयाची साथ सोडली नाही. महाविद्यालयीन कालखंडातही डॉक्टरांनी दहा



**निमित्त**

एकांकीका आणि पाच नाटकांमध्ये काम केले होते. डॉक्टरांची इच्छा तर अभिनय क्षेत्राकडे वळण्याची होती, परंतु त्यांच्या आई-वडिलांना त्यांनी डॉक्टर व्हावे असे वाटत होते. वैद्यकीय शिक्षण पूर्ण झाल्यानंतर डॉक्टरांनी काही काळ मुंबई-पुण्यासारख्या शहरांमध्ये डॉक्टरकीची प्रॅक्टिस केली.

डॉक्टरांवर लहानपणापासूनच मराठी नाटकांचा प्रभाव होता. त्यावेळचे नामवंत अभिनेते नानासाहेब फाटक, केशवराव दाते, मामा पेंडसे आणि मास्टर दीनानाथ आदींच्या अभिनयाचा डॉक्टर लागूंवर प्रचंड प्रभाव होता. त्याच दरम्यान काही अभिनेत्यांकडूनही ते प्रेरित झाले होते. नाटक आणि अनेक रंगकर्मी सतत डॉक्टरांच्या डोक्यात फिरत होते. दुर्दैवाने त्याच दरम्यान तीन वर्षांसाठी वैद्यकीय व्यवसायानिमित्त डॉक्टर लागूंना आफ्रिकेला जावे लागले. नियतीच्या या फेऱ्यांमध्ये डॉक्टरांना असं वाटलं की, त्यांचे सर्व जीवनच स्तब्ध झाले आहे, परंतु लवकरच ती वेळ आली जेव्हा आफ्रिकेतून परतता क्षणीच डॉक्टर लागूंनी त्यांच्या वैद्यकीय क्षेत्राला पूर्णविराम दिला आणि नेहमीसाठी अभिनयाची कास धरली.

डॉ. लागूंच्या अभिनय कारकीर्दीची सुरुवात १९६९ साली वसंत कानेटकर यांच्या 'इथे ओशाळला मृत्यू' या नाटकाने झाली. डॉ. लागूंना रंगभूमीवर येताच यश मिळाले असे झाले नाही. सुरुवातीची त्यांची काही नाटके खूप चालली असेही म्हणता येणार नाही, मात्र दुसऱ्या वर्षी पुरुषोत्तम दारव्हेकर यांचे 'नटसम्राट' हे नाटक रंगभूमीवर आले आणि डॉक्टर लागूंना त्यातील 'अप्पासाहेब बेलवलकर' या पात्राने एक नवी ओळख मिळवून दिली. रसिक प्रेक्षकांनी हे नाटक डोक्यावर घेतलं. रंगभूमीला डॉक्टर लागूंच्या रूपात खरा 'नटसम्राट' लाभला! मराठी रंगमंचावर विजय तेंडुलकर तसेच अरविंद देशपांडे यांसारख्या अभ्यासू व्यक्तिमत्वांसोबत काम करून डॉक्टर लागूंनी मराठी रंगभूमीला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

१९७२ साली डॉ. लागूंना प्रसिद्ध निर्माता-दिग्दर्शक व्ही. शांताराम यांच्या 'पिंजरा' या मराठी चित्रपटात काम करण्याची संधी मिळाली. यातील डॉ. लागूंची 'मास्तर' ही व्यक्तिरेखा खूप गाजली. त्यांच्या त्यांच्या कार्यकाळात अनेक पुरस्कार लाभले. ते जसे अभिनेता होते तसेच त्यांच्यात एक लेखकही वसला होता. त्यांनी स्वतःचे जे आत्मचरित्र लिहिले आहे 'लमाण' त्यातून हे सिद्ध होते. अशा या कलावंताचा १७ डिसेंबर २०१९ रोजी पुण्यात मृत्यू झाला. **(साभार : इंटरनेट)**

**क्लिक...क्लिक...!**



**पनवेल : दिवाळीनिमित्त शहरातील कोळीवाडा येथे बच्चेकंपनीने साकारलेल्या किल्ल्याचे अनेकांनी कौतुक केले आहे.**

## आरोग्य प्रहर

### आवळा खा आणि आजारांना दूर ठेवा!

आवळा म्हणजे खरंतर भारतीय आयुर्वेद आणि पाकशास्त्रच लाडकं फळ. आवळ्याचा रस, आवळ्याचा कीस, आवळ्याचे सरबत, आवळ्याचे लोणचे, पाकातील आवळा, आवळा पवार. आवळा च्यवनप्राश कोणत्याही स्वरूपात आवळा वापरता येतो आणि गुणकारी असतो.



ज्यांच्या शरीरात कोलेस्ट्रॉलचे प्रमाण जास्त असते त्यांना आवळा खाल्ल्यामुळे अत्यंत चांगले फायदे होतात. आवळ्यातील बायो-ॲक्टिव्ह कंपाऊंड ट्रायग्लिसेराईड्सचे प्रमाण कमी करतात तसेच चांगले कोलेस्ट्रॉल म्हणजे एचडीएल (हाय डेन्सिटी लिपोप्रोटीन- चांगले कोलेस्टेरॉल)चे प्रमाण वाढवतात. लो-डेन्सिटी लिपोप्रोटीन (ज्याने शरीरातील रक्तवाहिन्या जाडसर होऊ शकतात असे कोलेस्टेरॉल) त्यांचेदेखील प्रमाण कमी करतात. यासोबत वाढलेले कोलेस्टेरॉलचे प्रमाण कमी करण्याचे प्रमाण आवळ्यामुळे केले जाते.

आवळ्याचा आणखी एक फायदा म्हणजे आवळा हा मधुमहींसाठी अत्यंत गुणकारी आहे. आवळ्यामध्ये असणाऱ्या एलेजीक ॲसिड आणि जीवनसत्व क मुळे शरीरातील साखरेचे प्रमाण अत्यंत संतुलित प्रमाणात राहिले राखले जाते. विशेषतः अमाईलेज आणि ग्लुकोज या दोघांचे शरीरातील संतुलन राखण्यासाठी आवळा गुणकारी आहे.

मधुमेह असणाऱ्यांसाठी आवळ्याचा रस किंवा आवळ्याचा अर्क हा शरीरातील ग्लुकोज आणि ट्रायग्लिसेराईडचे प्रमाण कमी करण्यासाठी अत्यंत उपयुक्त आहे. ज्यांचे सिरम इन्सुलिन वाढलेले असते त्यांच्यासाठी आवळ्याचा रस अत्यंत गुणकारी आहे रोज किमान १०० ते ३०० मिली इतका आवळ्याचा रस नियमितपणे प्यायल्यामुळे शरीरातील इन्सुलिनचे प्रमाण संतुलित राखण्यास मदत होते. याव्यतिरिक्त आवळा हा अत्यंत उपयुक्त फळ आहे. आवळ्यामुळे शरीरातील पेशींचे आरोग्य सुधारते तसेच पेशींचे आवरणदेखील अत्यंत तंदुरुस्त होऊन जाते.

ज्यांना श्वसनाचे विकार आहेत किंवा ज्यांना हृदयरोग आहेत त्यांना हृदयाचे आरोग्य सुधारण्यासाठी आवळ्यासारखे फळ नाही. शरीरामध्ये जर कोणत्याही प्रकारच्या आम्लांचे असंतुलन असेल तर आवळा अत्यंत गुणकारी आहे. वजन कमी करण्याच्या अनेक औषधांमध्ये आवळ्याचा अर्क वापरला जातो. लहान मुलांचे पचन स्वास्थ्य वाढविण्यासाठी रोज एक चमचा आवळा खाण्यात असायला हवा. ज्या स्त्रियांना केस गाळण्याची समस्या आहे त्यांनी रोज एक आवळा नियमित खाल्ल्यामुळे उत्तम फरक दिसून येतो. त्वचेच्या विकारांमध्ये आवळा अत्यंत गुणकारी आहे.

# सलग सुट्ट्यांमुळे रायगडात पर्यटकांची गर्दी



**अलिबाग : प्रतिनिधी**

शाळा-महाविद्यालयांना दिवाळीनिमित्त पडलेली सुटी आणि शासकीय कार्यालयांना असलेली सलग सुटी यामुळे लोक फिरण्यासाठी घराबाहेर पडले आहेत. लोकांनी पर्यटनासाठी रायगडाला पसंती दिली आहे. रायगडचे किनारे पर्यटकांच्या गर्दीने फुलून गेले आहेत. अलिबागसह मुरूड, काशीद, नागाव, दिवेआगर, श्रीवर्धनच्या किनाऱ्यांवर पर्यटकांची गर्दी दिसून येत आहे.

सलग चार दिवस सुटी मिळाल्याने लोकांनी फिरायला जाण्याचा बेत आखला. त्यासाठी रायगडच्या किनारयांना मोठी पसंती दिल्याचे पहायला मिळते. मुंबईहुन जवळ असलेल्या तसेच मिनी गोवा म्हणून पर्यटकांची प्रमुख पसंती असलेल्या अलिबाग व मुरुडकडे वेळेची व इंधनाची बचत करत मांडवामार्गे जलप्रवासाने पर्यटक दाखल झाले आहेत. सागरी सफरीचा आनंद घेत येथे आलेले पर्यटक मनसोक्त हुंदडत इथल्या निसर्ग सौंदर्याचा अनुभव घेत आहेत. समुद्र स्नानाबरोबरच एटिव्ही राईड, जेस की, बनाना राईड यासारख्या वेगवेगळ्या वॉटर स्पोर्ट्सचा आनंद घेत आहेत. ताज्या मासळी वर ताव मारत आहेत. उंट सवारी घोडा गाडी यामुळे बच्चेकंपनीही खुश आहे.

या निमित्ताने रायगडच्या सागरी पर्यटन हंगामाला सुरुवात झाली आहे. पर्यटकांच्या आगमनाने व्यावसायीकदेखील खुश आहेत. इथल्या हॉटेल व्यावसायिकांबरोबरच घरगुती कॉटेजेस, छोटेमोठे विक्रेते यांना चांगला व्यवसाय उपलब्ध झाला आहे. पर्यटकांची ही रेलचेल सुटट्या संपेपर्यंत अशीच कायम राहणार आहे.

## फटाक्यांच्या दुकानातून फटाक्यांची चोरी

**महाड : प्रतिनिधी**

दिवाळीमध्ये मागणी असलेल्या फटाक्यांची दुकाने शहरात विविध ठिकाणी उभी राहिली आहेत यापैकी छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे नगरपालिकेच्या मोकळ्या जागेत उभ्या केलेल्या फटाक्यांच्या स्टॉल मधून अज्ञात चोरांनी फटाक्यांची चोरी केली आहे. याबाबत महाड शहर पोलीस ठाण्यात फटका विक्रेत्याने तक्रार दाखल केली आहे.



महाड शहर पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे मोकळ्या जागेमध्ये फटाक्यांचे स्टॉल उभे करण्यात आले आहेत. यातील सौरभ देवेंद्र देवरुखकर वय २५ याने उभ्या केलेल्या स्टॉल मधून दोन अज्ञात व्यक्तींनी मोठ्या प्रमाणात फटाक्यांची चोरी केल्याचे उघड झाले आहे. १३ ते १४ नोव्हेंबर या कालावधीत दोन अनोळखी व्यक्ती दुकानांमध्ये येऊन त्यांनी जवळपास ७१ हजार ८०० रुपये किमतीचा फटाक्या चोरून नेले. एकूण ७१,८०० रुपये किमतीच्या मालाचा समावेश आहे.

याबाबत फटाका विक्रेता सौरभ देवरुखकर याने महाड शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असता अज्ञात व्यक्तींविरोधात भादवि कलम ३८०, ३४ अन्वये गुन्हा दाखल केलेला आहे. अधिक तपास पोलीस हवालदार पवार हे करत आहेत.

## भाऊबीजेनिमित्त मटण मासळी बाजारात गर्दी

**खोपोली : प्रतिनिधी**

भाऊबीज व दिवाळी सणाचा कर त्यात पडलेला बुधवार असे सगळे बेत एकत्र आल्याने बुधवारी मटण व मासळी बाजारात खवय्यांची तोबा गर्दी झाली होती. अनेक दुकानांवर तर लांबच लांब रांगा लागल्या होत्या.

सर्वाधिक गर्दी चिकन-मटण घेण्यासाठी होती. मासळीचे दर मोठ्या प्रमाणावर वाढले असल्याने खवय्यांची पहिली पसंती चिकन, त्यानंतर मटण व मासळी अशी होती. खोपोलीत बुधवारी दिवाळी कर अधिक खप बघता या निमित्ताने चिकनच्या दरातही किलो मागे २० वाढ करण्यात आली होती. तरीही ग्राहकांची तुफान गर्दी मटण-चिकन दुकानांवर होती.





**नागोठणे : राष्ट्रवादी काँग्रेसचे नागोठणे विभागीय नेते भाईसाहेब टके यांना वाढदिवसानिमित्त खासदार सुनील तटकरे व आमदार अनिकेत तटकरे यांनी शुभेच्छा दिल्या.** (छाया : शामकांत नेरपगार)

## सामूहिक प्रयत्न हाच विकासाचा राजमार्ग -विनायक काशीद

**कर्जत : प्रतिनिधी**

सामूहिक प्रयत्न हाच विकासाचा राजमार्ग असल्याने संस्थेचा नावलौकिक टिकविण्यासाठी कटिबद्ध होऊ या, असे प्रतिपादन डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेचे नवनियुक्त सदस्य विनायक काशीद यांनी येथे केले. भात संशोधन केंद्राला भेट देण्याच्या निमित्ताने येथे आले होते.



अध्यक्षस्थानी सहयोगी संशोधन संचालक डॉ. शिवराम भगत होते. या भेटीत काशीद यांनी सर्वच प्रक्षेत्रांना भेट देऊन संशोधन व विस्तार कार्याचा आढावा घेत संशोधनातील बारकावे जाणून घेतले, सांगोपांग चर्चेत बहुमूल्य सूचना करीत शास्त्रज्ञांशी समरस होत प्रसंगी कौतुकाची थाप तर दिलीच शिवाय अडचणी जाणून घेण्याचा मोठेपणा दाखविल्याने ही भेट संस्मरणीय ठरली.

या वेळी भात तज्ज्ञ डॉ.भरत वाघमोडे, विस्तार शिक्षण शास्त्रज्ञ डॉ. रवींद्र मर्दाने, वनस्पती रोग शास्त्रज्ञ डॉ. पुष्पा पाटील, भात शरीरक्रिया शास्त्रज्ञ डॉ. जालिंदर देवमोरे, कनिष्ठ पीक शास्त्रज्ञ मीनाक्षी केळुस्कर, कीटकशास्त्रज्ञ डॉ. वैशाली सावंत, जीवरसायन शास्त्रज्ञ डॉ. तुषार बेडसे, मृद शास्त्रज्ञ डॉ. देवदत्त जोंधळे, कनिष्ठ भात पैदासकार डॉ. महेंद्र गवई, कनिष्ठ संशोधन सहायक डॉ. राजेंद्र सावळे या शास्त्रज्ञांनी त्यांनी केलेल्या संशोधन कार्याची संक्षिप्त माहिती सादर केली.

या वेळी समृद्ध कोकण अभियानाचे अजय यादवराव व अमित बाळसराफ, काजू प्रक्रिया संघ रत्नागिरीचे प्रताप पवार प्रामुख्याने उपस्थित होते. उपस्थितांचे आभार डॉ. रवींद्र मर्दाने यांनी मानले.

## शांताबाई नारायण शेळके ट्रस्टमार्फत आदिवासी भगिनींना साड्या वाटप



**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे विभागातील शिहू येथील भाजपचे ज्येष्ठ कार्यकर्ते डॉ. रोहिदास शेळके यांच्या मातोश्री शांताबाई नारायण शेळके ट्रस्टच्या वतीने प्रत्येक दिवाळी सणाला आदिवासी भगिनींना साडी व दिवाळी फराळाचे वाटप करण्यात येते. याच अनुषंगाने शांताबाई नारायण शेळके ट्रस्टकडून नागोठणे मिरानगर आदिवासीवाडी येथील भगिनींना दिवाळीनिमित्त फराळ व साड्या वाटप करण्यात आले. या गोड व लोकपयोगी कार्यक्रमास किशोर जैन, नागोठणे सरपंच सुप्रिया महाडिक, नागोठणे पोलिस निरीक्षक संदिप पोमन, सामाजिक कार्यकर्ते डॉ. रोहीदास शेळके, हभप बापु महाराज रावकर, जगताप, सामाजिक कार्यकर्ते मजीद लंबाते, ग्रामपंचायत सदस्य ड.प्रकाश कांबळे, मंगीताई कातकरी, पोलीस कर्मचारी विनोद पाटील, दिगंबर खराडे आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

## नांगरवाडीत दिवाळी पहाट कार्यक्रम

**रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील नांगरवाडी येथून दिपवालीच्या निमित्ताने दिवाळी पहाट कार्यक्रम सकाळी सात वाजता झाला. सोशल मिडियाच्या माध्यमातून फेसबूकद्वारे प्रसारीत कार्यक्रमास दोन हजार रसिकांनी या कार्यक्रमाचा आस्वाद घेतला.

नांगरवाडी येथून १२ नोव्हेबर रोजी भाजप जिल्हा उपाध्यक्ष दिलीप भोईर व संदेश पालकर यांच्या सहकार्याने दिवाळी पहाट कार्यक्रम सकाळी सात ते दहा दरम्यान झाला. कार्यक्रम सोशल मिडियाच्या फेसबुक अंकाउंटव्दारे प्रसारीत करण्यात आला होता, सुमारे दोन हजार रसिकांनी या कार्यक्रमाचा आस्वाद घेतला असे नांगरवाडी ग्रामस्थ राज धुमाळ यांनी सांगितले.

या कार्यक्रमास अरविंद पाटील, जागृती पाटील, लंकेश पाटील, निवेदक किशोर पाटील, तबला वादनकार अजित भोपी, किबोर्ड पियुश, पंखवाज वादक स्मित पाटील, यांची साथ लाभली. दिपवालीच्या शुभदिनी भक्तीगीते, भजन, अंभग यांचे गायनानी रसिकांचे मने तृप्त झाली, नांगरवाडी ग्रामस्थ राज धुमाळ गेले चार वर्ष हा कार्यक्रम राबवित आहेत.



## कर्जतमध्ये शिवसेनेकडून दीपोत्सव



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत शहरात असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज स्मारक येथे शिवसेना पक्ष यांच्या वतीने दीपोत्सव आणि शिव आरती आयोजित करण्यात आले होते. डेक्कन जिमखाना येथे असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज स्मारक येथे एक दिवा छत्रपतींच्या चरणी या निमित्ताने आमदार महेंद्र थोरवे फाऊंडेशन यांच्या माध्यमातून हा सोहळा आयोजित करण्यात आला होता. आमदार महेंद्र थोरवे फाऊंडेशन यांच्या माध्यमातून कर्जत शहरातील डेक्कन जिमखाना येथे असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज स्मारक येथे दीपोत्सव आयोजित करण्यात आला होता. दिवाळी पाडव्यानिमित्त आयोजित केलेल्या दीपोत्सवाची सुरुवात दीप प्रज्वलन करून करण्यात आली. त्यावेळी तेथे आमदार महेंद्र थोरवे फाऊंडेशनकडून फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. त्यानंतर उपस्थित शिवप्रेमी यांच्याकडून स्मारक परिसरात दिवे प्रज्वलित करण्यात आले. शेकडो दिवे प्रज्वलित करण्यात आल्यानंतर शिव आरती करण्यात आली. कर्जत नगर परिषदेचे स्वीकृत नगरसेवक आणि आमदार महेंद्र थोरवे फाऊंडेशन चे संचालक संकेत भासे यांनी शिव आरती केली. या वेळी शिवसेना पक्षाचे कार्यकर्ते तसेच स्थानिक शिवप्रेमी यांचा या शिव आरती मध्ये सहभाग होता.

शिवसेना पक्षचा वतीने पहिल्यांदा कर्जत येथे दिवाळी पाडवा निमित्त दीपोत्सव आणि शिव आरती कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांना दिवाळीचा पहिला दिवा अशी संकल्पना ठेवून या कार्यक्रमाचे आयोजन केले गेले. या वेळी शिवजयंती उत्सव साजरा करणाऱ्या तरुणांची मोठी गर्दी होती.



**माणगाव : येथील साहिल देशमुख, भाविका देशमुख, सायली देशमुख, श्रद्धा देशमुख, जयेश देशमुख, हर्षल देशमुख यांनी दिवाळीनिमित्त तोरणा गडकिल्ल्याची प्रतिकृती साकारली आहे.**

## पेण भाजपच्या वतीने आयोजित दिवाळी पहाटच्या गीतांनी रसिक मंत्रमुग्ध

**पेण : प्रतिनिधी**

आमदार रविशेठ पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व पेण शहर भारतीय जनता पक्षाच्या वतीने सोमवारी दिवाळी पहाटचे आयोजन पेण नगर पालिकेसमोर करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात आमदार रविशेठ पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी माजी नगरसेवक सुधीर जोशी, माजी सभापती ज्योति म्हात्रे, भाजप पेण तालुकाध्यक्ष श्रीकांत पाटील, शहर अध्यक्ष हिमांशू कोठारी, माजी नगराध्यक्ष रघुनाथ बोरेकर, माजी उपनगराध्यक्ष दिलीप लाड, माजी सभापती प्रकाश पाटील, माजी नगरसेवक अजय क्षीरसागर, शोमेर पेणकर, जनार्दन जाधव तसेच कृष्णा वर्तक, रवींद्र म्हात्रे, प्रशांत तेलवणे आदींसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.






या वेळी रायगड भूषण गायक संतोष पाटील व त्यांचे सहकारी गायक केळकर (चिपळूण), गायिका गीता पुराणिक (मुलूंड), अश्विनी म्हात्रे, निवेदक अजित वाराणसीवार आदींनी भक्तिगीते, भावगीते सादर करून उपस्थित प्रेक्षकांची वाहवा मिळविली. आमदार रविशेठ पाटील यांनी उपस्थित नागरिकांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. विठ्ठलाच्या नामाने या संगीत स्वरसंगीत कार्यक्रमाची सांगता गायक संतोष पाटील यांनी केली.

# माथेरानमध्ये पर्यटकांची मांदियाळी

## हॉटेल्स, लॉज हाऊसफुल्ल; व्यावसायिकांमध्ये समाधान

**माथेरान : रामप्रहर वृत्त**



साडेतीन शुभमुहूर्तांपैकी एक म्हणजे दिवाळी पाडवा. या दिवसाची जाहीर सुट्टी असल्याने बहुतांश पर्यटकांनी आपला मोर्चा माथेरानच्या दिशेने वळविला असून जिकडेतिकडे पर्यटकांची मांदियाळी पहावयास मिळत आहे.

दिवाळीचा सण साजरा करण्यासाठी आणि या सुट्ट्याचा मनमुराद आनंद लुटण्यासाठी पर्यटकांनी हॉटेल्स आणि लॉज बुकींग केलेल्या आहेत. सहा ते सात हजार पर्यटकांनी इथे हजेरी लावल्यास हे पर्यटनस्थळ पुर्णतः फुल होऊन जाते. त्यामुळे अनेकदा आपल्या लवाजम्यासह आलेल्या पर्यटकांना माघारी जाण्याशिवाय गत्यंतर नसते. त्यातच बहुतेक ठिकाणी ऐन गर्दीच्या वेळी पर्यटकांना खोल्या उपलब्ध व्हाव्यात यासाठी या हेरिटेज स्थळावर केवळ पर्यटकांच्या सेवेसाठी गावात मोठया प्रमाणावर खोल्या बांधल्या जात आहेत. दरवर्षी जवळपास १०० खोल्या उभ्या राहात आहेत. त्यामुळे याच माध्यमातून पर्यटकांची राहण्याची व्यवस्था उत्तम प्रकारे होत आहे.

नेरळ ते माथेरानदरम्यान फक्त दोन ट्रेन असल्याने आणि शटलच्यासुद्धा ठराविक फेऱ्या असल्याने पर्यटकांना तिकीटे उपलब्ध होत नाहीत त्यामुळे त्यांचा हिरमोड होताना दिसून येत आहे. आलेले पर्यटक घोडा आणि हातरिक्षामधून पॉईंट्सची सैर करून इथल्या निसर्गसौंदर्याचा मनमुराद आनंद घेत आहेत. व्यावसायिक हे पर्यटकांना दूरवरच्या पॉईंट्सवर नेण्याची तसदी घेत नाहीत. त्यामुळे जवळच्या पॉईंट्सवरील स्टॉलधारकांना चांगल्या प्रकारे उत्पन्नाचे साधन प्राप्त होत आहे. हॉटेल्स तसेच दुकानदार यांनी पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी रंगीबेरंगी विद्युत रोषणाई केलेली आहे.

सायंकाळी बाजारपेठेत खरेदीसाठी मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असून दुकानदार पर्यटकांच्या सेवेसाठी सज्ज झाले आहेत. गर्दीमुळे कुठल्याही प्रकारे कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी एपीआय शेखर लव्हे यांचे सहकारी बारीक लक्ष ठेऊन आहेत.

> **माथेरान हे खूपच सुंदर ठिकाण असल्यामुळे दरवर्षी न चुकता आम्ही येतो. इथल्या निसर्गाच्या शांतताप्रिय अशा येथील सान्निध्यात रममाण होण्यात जो आनंद मिळतो तो अगणितच आहे. इथे वाहतुकीची स्वस्तात व्यवस्था निर्माण झाल्यास याठिकाणी आणखीन पर्यटक येतील आणि शटल फेऱ्या कमी असून बोग्यासुद्धा कमी आहेत. त्यात वाढ होणे आवश्यक आहे.**
>
> **–शरण निरगुडकर, पर्यटक, मुंबई**

## कर्जतमधील तरुणाचा नदीत बुडून मृत्यू

**कर्जत : प्रतिनिधी**

ऐन दिवाळीच्या सणामध्ये हेले कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. कशेळे खोंडेवाडीत राहाणारा यशवंत दुंदा हेले याचा शुक्रवारी नदीत बुडल्याने मृत्यू झाला.

शेतातील मोलमजुरीवर भातझोडणीचे काम पूर्ण करून मित्रांसोबत पार्टी करण्यासाठी म्हणून यशवंत नदीवर गेला आणि बुडाला. पट्टीचा पोहणारा यशवंत नदीला असणाऱ्या कमी पाण्यात बुडू कसा शकतो? असा ग्रामस्थांनी संशय व्यक्त केल्याने कर्जत पोलिसांनी यशवंतसोबत असणाऱ्या चार मित्रांना चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे.

तालुक्यातील कशळे पाथराज ग्रामपंचायत हद्दीतील खोंडेवाडी येथील राहणारा यशवंत हेले हा मोलमजुरीवर म्हणून गावातील शेतकऱ्याच्या शेतातील भातझोडणीसाठी गेला होता. सोबत कशेळे दोरेवाडी येथील जिवलग चार मित्र एकत्र होते. शेतातील काम पूर्ण आटपून दुपारी यशवंत व त्याचे चार मित्र असे एकूण पाच जण गावाला लागून वाहणाऱ्या चिल्हार नदीवर पार्टी करण्यासाठी म्हणून गेले होते.

सोबत आणलेली दारू पिऊन पाच जण नदीच्या पाण्यात पोहण्यासाठी म्हणून उतरले. यशवंतसोबतचे चार मित्र नदीबाहेर येत घरी ५-५.३० वाजण्याच्या सुमारास निघून गेले होते. घरी गेलेल्या मित्रांपैकी एकाला उशिरा आठवण झाली.



यशवंत आपल्यासोबत पाण्याबाहेर आलाच नव्हता. त्यामुळे पुन्हा चार मित्र यशवंतला शोधण्यासाठी रात्री नदीवर पोहचले. अंधार झाल्याने यशवंत कुठे दिसत नव्हता. गावातील नागरिकदेखील शोधण्यासाठी नदीवर पोहचले होते.

याबाबत ग्रामस्थांनी कशेळे पोलीस ठाण्यात माहिती देताच रात्री १२ वाजण्याच्या सुमारास पोलीस घटनास्थळी दाखल झाले. दुसऱ्या दिवशी सकाळी येथील ग्रामस्थांना यशवंतचा मृतदेह पाण्यात दिसला.

पोलिसांनी यशवंतचा मृतदेह ग्रामस्थांच्या मदतीने पाण्याबाहेर काढून शवविच्छेदनासाठी उपजिल्हा रुग्णालयात पाठविला.

यशवंत बुडाला त्या ठिकाणी नदीपात्रात पाणी कमी होते. यशवंत हा पट्टीचा पोहणारा असल्याचे ग्रामस्थांनी पोलिसांना सांगून मृत्यूबाबत संशय व्यक्त केला. त्यामुळे अधिक चौकशीसाठी म्हणून कर्जत पोलिसांनी यशवंतसोबत असलेल्या चार मित्रांना ताब्यात घेतले आहे. अधिक तपास कर्जत पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड यांच्या मार्गदर्शनाखाली कशेळे पोलीस ठाण्याचे पोलीस थोरवे आणि राठोड हे तपास करीत आहेत.

## पेण उंबरमाळ आदिवासी वाडीत रस्त्याच्या कामाचा शुभारंभ

**पेण : रामप्रहर वृत्त**

तालुक्यातील उंबरमाळ आदिवासीवाडीच्या रस्त्याच्या खडीकरणाच्या पहिल्या टप्प्याचे काम सोमवारी (दि. १३) रायगड भूषण सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून सुरू करण्यात आले.

या वाडीतील आदिवासींना जंगलातील पायवाटेतून जाताना जंगलातील हिंस्त्र प्राण्यांपासून जीव मुठीत घेऊन पायपीट करावी लागत होती. या रस्त्याच्या निमित्ताने ग्राम संवर्धन सामाजिक संस्था, बांधनवाडी आणि महाराष्ट्र स्टुडंट युनियन या संघटनांनी आदिवासी बांधवांसोबत केलेल्या पाठपुराव्याला यश आले आहे.

उंबरमाळमधील आदिवासी बांधवांच्या चेहऱ्यावर आनंदाचे क्षण दिसत होते. या वेळी प्रजापिता ईश्वरीय ब्रह्माकुमारी पेन शाखेचे अनुयायी किशोर पाटील, सुनीता पाटील, स्थानिक आदिवासी कार्यकर्ते सुनील वाघमारे, गुळसुंदे ग्रामपंचायत सदस्य महेश पाटील, राम राऊत, यशवंत वाघमारे, मंगल वाघमारे, किसन पवार, कमळी पवार, सुमन पवार, शिमग्या हिलम, रेणुका हिलम, सचिन पवार, रुपाली वाघमारे, गीता वाघमारे आदी उपस्थित होते.



## मोर्बा ग्रामपंचायतीचा विकास साधणार –खासदार सुनील तटकरे





### गाव तलाव सुशोभिकरण कामाचा शुभारंभ

**माणगाव : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेचा अध्यक्ष असल्यापासून ते आजतागायत जवळपास माझ्या ३० वर्षांच्या राजकीय कारकिर्दीत धर्मनिरपेक्ष विचार नजरेसमोर ठेवून मोर्बा व मोर्बा परिसरातील गावांचा विकास साधण्याचा मी प्रामाणिकपणे प्रयत्न केला. या ग्रामपंचायतीचा व परिसरातील गावांचा यापुढे महायुती सरकारच्या माध्यमातून विकास साधणार असल्याचा विश्वास खासदार सुनील तटकरे यांनी ग्रामस्थांना दिला.

पर्यटन विकास योजना कार्यक्रमांतर्गत मोर्बा येथे पाच कोटी रुपयांच्या निधीचा मंजूर झालेल्या गाव तलाव सुशोभीकरण करणे कामाचे भूमिपूजन व ग्रामपंचायत निवडणुकीत विजयी सरपंच सदस्यांचा सत्कार समारंभ सोमवारी (दि. १३) महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते तसेच आमदार अनिकेत तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. त्या वेळी खासदार सुनील तटकरे बोलत होते. या कार्यक्रमास तालुका समन्वय समिती माजी अध्यक्ष इकबाल धनसे, तालुका राष्ट्रवादी अध्यक्ष सुभाष केकाणे, जेष्ठ मार्गदर्शक रहेमान धनसे, विकास गायकवाड, अल्ताफ धनसे, उणेगाव माजी सरपंच राजेंद्र शिर्के, गोरेगाव सरपंच जुबेर अब्बासी, दहिवली सरपंच मुस्ताक बंदरकर, उणेगाव सरपंच शुभांगी शिर्के, होडगाव सरपंच बळीराम खाडे, जिल्हा युवक राष्ट्रवादी उपाध्यक्ष शादाब गैबी, ज्येष्ठ कार्यकर्ते इम्तियाज धनसे, बकरशेठ गंगरेकर, अब्दल्ला जालगावकर, संताजी पवार, अजीज गंगरेकर, अब्दुल्ला गंगरेकर, माजी सरपंच शरीफ बडे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

ना. आदिती तटकरे म्हणाल्या की, मोर्बा ग्रामपंचायत हद्दीतील ग्रामस्थांचे आभार मानावे तेवढे थोडेच आहेत. मोर्बा ग्रामपंचायत निवडणुकीत मोर्बेकरांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला विकासकामांच्या मुद्यावर अल्ताफ धनसे यांच्या नेतृत्वाखाली निवडून दिले. यापुढेही आम्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून मोर्बा गावासह संपूर्ण श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघातील गावांच्या विकासकामांसाठी बांधील आहोत, असे सांगत दीपावलीच्या शुभेच्छा दिल्या.

आमदार अनिकेत तटकरे म्हणाले की, मतदारांचे अंतःकरणातून आभार व्यक्त करतो. आपण सर्वांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व तटकरे साहेबांवर विश्वास दाखवून मोर्बा ग्रामपंचातीवर राष्ट्रवादी काँग्रेसला एकहाती सत्ता दिली. मोर्बा ग्रामपंचायतीसाठी माझ्या आमदार निधीतून १५ लाखांचा विकासनिधी देत असल्याचे ते म्हणाले. नवनिर्वाचित सरपंच जनाब शौकत रोहेकर यांनी, मतदार बंधू-भगिनी यांचे आभार व्यक्त केले. या वेळी नवनिर्वाचित सरपंच शौकत रोहेकर, सदस्य विजय मोरे, झुल्फिकार राऊत, इकबाल हर्णेकर, सदस्या शेहनाज हर्णेकर, जैनब धनसे, सुमय्या अन्सारी, आरीफा गंगरेकर, संतोष पाबरेकर, पूजा शिर्के, सुनीता जाधव, सुरेखा डवले तसेच दहिवली सरपंच मुस्ताक बंदरकर, उणेगाव सरपंच शुभांगी शिर्के, लोणशी सरपंच सिद्धेश पालकर यांचा सत्कार करण्यात आला.

## भाऊबीजेसाठी बंधुरायाचे बहिणीकडे आगमन

### मुरूडमधून जादा एसटी बसेसची उपलब्धता

**मुरूड : प्रतिनिधी**



एसटी महामंडळाकडून भाऊबीज असल्याने विविध ठिकाणी जादा बसेसची सुविधा करण्यात आली होती. बुधवारी सकाळपासूनच बंधुरायाचे बहिणीच्या घरी आगमन झाल्याने सर्वत्र भाऊबीजेचा उत्साह दिसत होता.

वर्षातून एकदाच भाऊरायाचे आगमन होत असल्याने बहिणींनीसुद्धा विविध पंच पकवान बनवून भोजनाची व्यवस्था केली होती. विशेष करून बुधवार असल्याने असंख्य लोकांनी आलेल्या पाहुण्यांचे स्वागत मांसाहारी जेवण बनविले होते. त्यामुळे पहाटेपासूनच मटणाच्या दुकानावर मोठी गर्दी दिसून आली.

भाऊबीज भेट देण्यासाठी कपड्यांची दुकाने तसेच स्टील व पितळी भांड्याच्या दुकानात मोठी गर्दी होती. भाऊराया येणार म्हणून प्रत्यके घराच्या अंगणात रंगीबेरंगी रांगोळ्या तर काहींनी प्रत्यक्ष भाऊबीज ओवाळणीचे रांगोळीसुद्धा काढली होती.

भाऊबीज असल्याने जे आवश्यक लागते त्याची खरेदी करण्यात कोणीही मागे पुढे पहिले नाही. मासळीचे प्रमाण कमी झाल्याने मच्छिमार्केटमध्ये मासळीचे भाव वधारले होते, तरीसुद्धा लाडक्या भाऊरायासाठी मासळीसुद्धा खरेदी करण्यात कोणीही मागे पुढे पहिले नाही.

रायगड जिल्हा मच्छिमार संघाचे जिल्हा उपाध्यक्ष मनोहर बैले यांनी सांगितले की, कोळी समाजामध्ये भाऊबीज खूप महत्त्वाची मानली जाते.

खोल समुद्रात गेलेल्या होड्या या खास भाऊबीज करण्यासाठी एक दिवस आगोदरच येतात, तसेच बहीण जरी खूप दूरवर अथवा महाराष्ट्र राज्य सोडून दुसऱ्या राज्यात असेल तरी भाऊराया आवश्य त्या ठिकाणी जाऊन भाऊबीज करून बहिणीला मोठे गिफ्ट अथवा मोठी रोख रक्कम देण्याची प्रथा असल्याचे सांगितले.

## मोबाईल चोर नागोठणे पोलिसांच्या ताब्यात

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे पोलिसांनी मोबाईल चोरणाऱ्या आरोपीस अटक करून ४८ हजार रुपये किंमतीचे तीन मोबाईल हस्तगत केले आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सुकेळी येथील फिर्यादींच्या रुममधील रेडमी ११ प्राईम मोबाईल किंमत १५ हजार तसेच त्याचेसोबत राहणारे दोघे यांचे टेक्नॉस्पार्क कंपनीचा मोबाईल किंमत १६ हजार व सॅमसंग कंपनीचा एम ११ मोबाईल किंमत १७ हजार असे ४८ हजार रुपये किंमतीचे एकूण तीन मोबाईल चोरून नेले. याबाबत नागोठणे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल झाल्यानंतर पोलिसांनी तपासाची सुत्रे फिरविली.



सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप पोमन यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार संतोष म्हात्रे व नयन रसाळ, महिला हवालदार प्रतीक्षा गायकवाड, पोलीस नाईक गंगाराम डुमणे, शिपाई रामनाथ ठाकूर व नम्रता अय्यर या टीमने जलद गतीने तपास करून आरोपीस अटक केली व त्याच्याजवळील ४८ हजार रुपये किंमतीचे तीन मोबाईल हस्तगत केले.

## फ्लॅट संस्कृतीत तुळशीचे अंगण हरवले

### धार्मिकतेसह औषधी गुणधर्म असल्यानेही महत्त्व

**खोपोली : प्रतिनिधी**

तुळशीचे वृंदावन तर हरवलेच, परंतु त्यासोबत लहान मुलांवरील संस्कारसुद्धा हरविले. घरातील आई, वडीलधारी माणसे सायंकाळी लहान मुलांना घेऊन तुळशीसमोर 'दिवा लागला तुळशीपाशी..', 'दिव्या दिव्या दीपत्कार..' यांसह धार्मिक श्लोक म्हणायला लावीत. अलिकडे हे सर्व नाहिसे झाले. वृंदावनासोबतच आमचे संस्कारसुद्धा हरवत चालले आहेत. आयुर्वेदामध्ये तुळशीचे माहात्म्य वेद, पुराण, आयुर्वेदामध्ये तुळशीचे माहात्म्य सांगितले आहे. श्री विष्णूला तुळस अत्यंत प्रिय आहे. तुळशीच्या पानांनी विष्णूचे पूजन केले, तर व्रत, यज्ञ, जाप केल्याचे फळ लाभते. कृष्णपत्नी रुक्मिणीचा अवतार तुळस आहे, असे मानले जाते. म्हणून कार्तिक शुद्ध द्वादशीस तुळशी विवाह लावला जातो आणि या दिवसापासून विवाह मुहूर्त प्रारंभ होतात.

भारतीय संस्कृतीमध्येच काय, आयुर्वेदामध्येसुद्धा तुळशीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. 'तुलसी श्रीसखी शुभे पापहारिणी पुण्य दे' असे म्हटले जाते ते उगाच नाही.



पूर्वी प्रत्येकाच्या घरासमोर सुंदरसे तुळशी वृंदावन असायचं. सकाळच्या प्रहरी तुळशीची पूजा होऊन घरात एकप्रकारचे धार्मिक वातावरण तयार व्हायचे, परंतु सध्याच्या काळात हे सर्व हरवत चालले आहे. अंगणामध्ये अगदी मानाचे स्थान असलेली तुळसाबाई आज जनमानसातून लुप्त होत आहे. खरे म्हणजे, तुळशीचे हक्काचे अंगणच हरवले आहे. लोकसंख्येच्या स्फोटात स्वतंत्र घरांचे अस्तित्व, घराची शोभा वाढविणारे तुळशी वृंदावन आणि एकूणच घरपण नष्ट होत चालले आहे. एकेकाळी हिंदू संस्कृतीमध्ये तुळशी वृंदावनाला महत्त्व होते. वृंदावन नसलेले घर क्वचितच बघायला मिळे. तुळशी वृंदावन अंगणात असण्यामागे धार्मिक किंवा आयुर्वेदिक आधार होता.

साधारणतः १५-२० वर्षांपूर्वीचा विचार केला, तर अंगणातील तुळशी वृंदावनासमोर महिला भगिनी दररोज तुळशीला पाणी घालत, प्रदक्षिणा घालून पूजा करीत असत. सायंकाळी दिवा लावला जायचा. अलिकडच्या काळात फ्लॅट संस्कृतीचा शिरकाव झाला. वाढत्या लोकसंख्येसाठी तरतूद म्हणून अपार्टमेंटसारख्या गगनचुंबी इमारती उभ्या राहू लागल्या. फ्लॅट संस्कृतीमध्ये दारासमोर अंगणच नसल्याने तुळशी वृंदावनाची संकल्पना बाजूला पडली. जुन्या काळी लोक घर बांधताना तुळशी वृंदावन आवर्जून उभारीत असत. अलिकडे तुळशीचे अंगणच हिरावून घेतले आहे. तुळशी वृंदावन संस्कृतीच आम्ही मोडीत काढली आहे.

# हिटमॅनचा घरच्या मैदानावर मोठा विक्रम

## वर्ल्डकपमध्ये ५० षटकार मारणारा पहिला फलंदाज



रोहित शर्मा

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्माने बुधवारी आपल्या होमग्राऊंड वानखेडेवर न्यूझीलंडशी दोन हात केले. रोहित शर्माने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना दमदार सुरुवात केली. त्याने शुभमन गिलसोबत धडाकेबाज अर्धशतकी सलामी दिली, मात्र रोहित शर्माचे अर्धशतक पूर्ण झाले नाही. तो २९ चेंडूत ४७ धावा करून बाद झाला, मात्र ही खेळी त्याने चार षटकार आणि चार चौकारांनी सजवली.

याचबरोबर रोहित शर्माने पहिल्या सात षटकातच चार टोलेजंग षटकार आणि तितकेच चौकारदेखील मारले. या षटकारांच्या आतशबाजीतच त्याने वर्ल्डकप इतिहासात आतापर्यंत जो विक्रम झाला नव्हता तो आपल्या नावावर केला. रोहित शर्मा हा आता वर्ल्डकप इतिहासात ५० षटकार मारणारा पहिला फलंदाज ठरला आहे.

न्यूझीलंडविरूद्धच्या सामन्यात शुभमन गिल सोबत ८.२ षटकात ७१ धावांची दमदार सलामी दिली. झेलबाद होण्यापूर्वीच तो विक्रमांची देखील माळ लावून गेला. रोहित शर्मा हा एका वर्ल्डकप स्पर्धेत सर्वाधिक षटकार मारणारा खेळाडू ठरला. याचबरोबर वर्ल्डकपमध्ये सर्वाधिक षटकार मारण्याचा विक्रमदेखील त्याने आपल्या नावावर केला. षटकारांचा बादशाह म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ख्रिस गेलला त्याने मागे टाकले.

४९ षटकार मारणारा ख्रिस गेल हा वर्ल्डकप इतिहासातील सर्वाधिक षटकार मारणारा खेळाडू होता. रोहितने षटकारांचे अर्धशतक पूर्ण करत हा विक्रम इतिहास जमा केला. रोहित शर्माने षटकारांच्या बाबतीत विक्रम केलाच. याचबरोबर त्याने संयुक्तरित्या वर्ल्डकपमधील सर्वात वेगाने १५०० धावा पूर्ण केल्या.

# महाडच्या रोशनी पारधीची महाराष्ट्र क्रिकेट संघांत निवड

## समीधा तांडेल, आर्या गडाडे राखीव खेळाडू





**महाड, अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशने महाराष्ट्राचा १५ वर्षांखालील मुलींचा संघ जाहीर केला आहे. या संघात रायगडची खेळाडू रोशनी पारधी हिची निवड करण्यात आली आहे. रायगडच्या समीधा तांडेल व आर्या गडाडे यांची राखीव खेळाडू म्हणून निवड करण्यात आली आहे, अशी महिती रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रकांत मते यांनी दिली.

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनने आयोजित केलेल्या १५ वर्षाखालील मुलींच्या निमंत्रित संघांच्या स्पर्धेत रायगड जिल्ह्याच्या संघातून खेळताना रोशनी पारधी हिने अष्टपैलू कामगिरी केली. याच स्पर्धेतील कामगिरी पाहून महाराष्ट्राचा संभाव्य संघ निवडण्यात आला होता. या संघाच्या सराव शिबिरातून महाराष्ट्राचा १५ खेळाडूंचा अंतिम संघ निवडण्यात आला. या अंतिम संघात रोशनी पारधी हिची निवड करण्यात आली. रायगडच्या समिधा तांडेल व आर्या गडाडे यांची राखीव खेळाडू म्हणून निवड करण्यात आली. रायगडच्या या खेळाडूंना रायगड संघाच्या प्रशिक्षक राजश्री अडबळ यांचे मार्गदर्शन लाभले.

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रकांत मते, कार्याध्यक्ष प्रदीप नाईक, उपाध्यक्ष प्रकाश पावसकर यांनी तसेच रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या सर्व सदस्यांनी या खेळाडूंचे अभिनंदन केले.

# एलआयसी-आयडियल बुद्धिबळ स्पर्धेत लोबो, गिरीश, हृदय प्रथम



**मुंबई : प्रतिनिधी**

आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे बालदिनानिमित्त झालेल्या एलआयसी-आयडियल कप बुध्दिबळ स्पर्धेतील विविध तीन वयोगट मुलांमध्ये लोबो दैतीन, गिरीश पै, हृदय मणियार आणि मुलींमध्ये माग्रा गोगरी, निविता गाला, शहाना कृष्णन यांनी प्रथम क्रमांक पटकाविला.

लाईफ इन्शुरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया पुरस्कृत फिडे गुणांकितसह राष्ट्रीय व राज्य असलेल्या बालबुद्दीबळपटूच्या सहभागाने रंगलेल्या स्पर्धेला आरएमएमएस व मुंबई शहर जिल्हा बुद्धिबळ संघटना यांचे सहकार्य लाभले होते. माजी क्रीडापटू व राष्ट्रीय मिल मजदूर संघाचे सरचिटणीस गोविंदराव मोहिते, बुध्दिबळ संघटनेचे सेक्रेटरी राजाबाबू गजेंगी, मनोहर गोराठे, संजय पेडणेकर, चंद्रकांत करंगुटकर, शिवछत्रपती पुरस्कार विजेते लीलाधर चव्हाण आदींच्या उपस्थितीत पारितोषिक वितरण झाले.

एलआयसी-आयडियल कप बुद्धिबळ स्पर्धेतील सात वर्षांखालील मुलांमध्ये अपराजित लोबो दैतीनने (५ गुण) प्रथम, अभिनंदन अरीकृष्णनने (४ गुण) द्वितीय, धैर्य अगरवालने (४ गुण) तृतीय तर मुलींमध्ये माग्रा गोगरीने (३ गुण) प्रथम, निवी मेननने (२ गुण) द्वितीय, रायकाह अगरवालने (२ गुण) तृतीय पुरस्कार जिंकला.

नऊ वर्षाखालील मुलांमध्ये फिडे गुणांकित गिरीश पैने (४ गुण) प्रथम, नचिकेत अयरने (३.५ गुण) द्वितीय, आरिष गांधीने (३.५ गुण) तृतीय तर मुलींमध्ये निविता गालाने (३ गुण) प्रथम, आराध्या पुरोने (२ गुण) द्वितीय, श्रव्या कांबळेने (२ गुण) तृतीय स्थान मिळविले.

११ वर्षांखालील मुलांमध्ये फिडे गुणांकित अपराजित हृदय मणियारने (५ गुण) प्रथम, एम. पी. आनंथाजीठने (४ गुण) द्वितीय, विवान कांबळेने (३ गुण) तृतीय तर मुलींमध्ये शहाना कृष्णनने (२.५ गुण) प्रथम, सैशा मुळेने (२ गुण) द्वितीय, हुसैना राझने (२ गुण) तृतीय क्रमांक पटकाविला.

# रायगडचा आर्यन पाटील उंच उडी खेळात चमकला




## सुवर्ण पदकाचा मानकरी!

**माणगाव : प्रतिनिधी**

तमिळनाडू कोईंबतूर येथे गुरुवारी पार पडलेल्या ३८व्या ज्युनिअर नॅशनल ॲथलॅटीक स्पर्धेत आर्यन पाटील याने पुन्हा एकदा बाजी मारली व महाराष्ट्राला उंच उडी खेळात गोल्ड मेडल मिळवून दिले आहे.

आर्यन अरुण पाटील हा माणगावातील रहिवासी असून त्याचे मुळगाव पेण तालुक्यातील रावे हे आहे. आर्यनचे आई-वडील शिक्षक असून नोकरी निमित्त गेली २५ वर्षे ते माणगावातच राहत आहेत. वडील आश्रमशाळेत नोकरी करीत असल्याने शाळेत शिकणाऱ्या आदिवासी मुलांच्यात राहून खेळ खेळणे, उड्या मारणे, पळणे आदी उपजत गुण आर्यनच्या अंगी आले. माझ्या अंगातील काटकपणा या माझ्या आदिवासी मित्रांमुळेच माझ्या अंगी आला असे आर्यन सांगतो. अनेक तालुका, जिल्हास्तरीय, राज्यस्तरीय खेळात आर्यनने यश संपादन केले आहे. एस. एस. निकम माणगाव या शाळेत शिकत असताना आठवीमध्ये त्याने राष्ट्रीय स्पर्धेत सहभाग घेतला.

आर्यन साई अकॅडमीच्या माध्यमातून पिल्लई कॉलेज रसायनी येथे खेळाबरोबरच एसवाय. बी.एससी आयटीचे शिक्षण पूर्ण करीत आहे. कोच इंझमाम आर्यनला उंच उडी खेळासाठी मार्गदर्शन करीत आहेत.






# भाऊबीजेचा सण उत्साहात साजरा

**पनवेल : दिवाळी सणातील भाऊबीज सर्वत्र उत्साहात साजरा करण्यात आली. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनाही त्यांच्या बहिणींनी ओवाळून भाऊबीजेच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी अनुसया वासकर, चंद्रभागा घरत, रत्नप्रभा घरत, राधाताई ठाकूर, तुळसाबाई घरत, पदुबाई म्हात्रे यांच्यासह बंधु भरतशेठ ठाकूर, कान्हाशेठ ठाकूर, हिराशेठ ठाकूर, नारायण ठाकूर, अरुणशेठ ठाकूर आदी उपस्थित होते. सर्व बहिणींनी आपल्या लाडक्या बंधुरायांना ओवाळून प्रेमाची भेटही दिली.**








# ऑस्ट्रेलिया आणि द. आफ्रिका यांच्यात आज दुसरी सेमीफायनल

**पुणे : प्रतिनिधी**

बंगालच्या उपसागरात वाऱ्याची चक्रीय स्थिती निर्माण झाली आहे. या चक्रीय स्थितीच्या प्रभावामुळे कमी दाबाचे क्षेत्र निर्माण होण्याची तसेच येत्या चार दिवसांत चक्रीवादळाची निर्मिती होण्याची चिन्हे आहेत. त्यामुळे विश्वचषक क्रिकेट स्पर्धेतील ऑस्ट्रेलिया-दक्षिण आफ्रिका यांच्यात १६ नोव्हेंबरला होणाऱ्या सेमीफायनलच्या सामन्यावर चक्रीवादळाचे सावट असून, त्या दिवशी जोरदार पावसाची शक्यता आहे.

सध्या बंगालच्या उपसागरात असलेल्या वाऱ्याच्या चक्रीय स्थितीची वाटचाल चक्रीवादळापर्यंत होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. गेल्यावर्षी मोसमी पावसानंतर ऑक्टोबरमध्ये बंगालच्या उपसागरात सितरंग चक्रीवादळाची निर्मिती झाली होती. दिल्लीच्या प्रादेशिक विशेष हवामानशास्त्रीय केंद्राने (आरएसएमसी) दिलेल्या माहितीनुसार बंगालच्या उपसागराच्या आग्नेय दिशेला वाऱ्याच्या चक्रीय स्थितीचे रुपांतर कमी दाबाच्या क्षेत्रात होऊ शकते. तसेच ते वायव्य दिशेला सरकत १६ नोव्हेंबरच्या सुमारास तीव्रता वाढू शकेल. त्यामुळे येत्या चार दिवसांत बंगालच्या उपसागरात चक्रीवादळाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

विश्वचषक क्रिकेट स्पर्धेतील ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील सेमीफायनलचा सामना कोलकात्याच्या ईडन गार्डन मैदानावर होणार आहे. या सामन्यातील विजेता अंतिम फेरीत प्रवेश करणार असल्याने क्रिकेटप्रेमींचे या सामन्याकडे लक्ष लागले आहे, मात्र चक्रीवादळामुळे पडणाऱ्या पावसाचे सावट या सामन्यावर आहे.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com